उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थासाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला ▸ कापड बाजार, अहमदनगर ▸ यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०९.०१.२०२५ | अंक नं. २६२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगर जिल्ह्यात शेअर ट्रेडिंग घोटाळ्याची व्याप्ती वाढतेय, आणखी २ गुन्हे दाखल

## शेवगाव, नगर पाठोपाठ पारनेर आणि श्रीगोंद्यातही लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर

नगर – नगर जिल्ह्यात शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास जादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आलेला आहे. या घोटाळ्याची व्याप्ती आता वाढत असून शेवगावपाठोपाठ नगर शहरात गुन्हे दाखल झाल्यानंतर आता पारनेर आणि श्रीगोंदा तालुक्यातही अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात दोघांवर आणि पारनेर पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शेवगाव तालुक्यात शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास जादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. मागील चार वर्षांपासून शेअर मार्केटचा हा काळा बाजार शेवगाव तालुक्यातील खेडोपाडी सुरू होता. दर महिन्याला १२ ते १५ टक्के परतावा देतो, असे आमिष दाखवून जवळपास २०० पेक्षा जास्त एजंट्सने शेवगाव शहरात आपला काळा धंदा सुरू केला होता. या एजंट्सने दाखवलेल्या आमिषाला बळी पडून लोकांनी कोट्यवधी रुपये जमा केले होते. या एजंट्सने सुरुवातीला लोकांना परतावा दिला. नंतर मात्र हेच एजंट्स आपल्या संपूर्ण कुटुंबासह गावातून पळून गेले आहेत. मागील ४ वर्षांपासून हा गोरखधंदा शेवगाव तालुक्यात सुरू असून, कोट्यावधी रुपयांची फसवणूक झालेली आहे. या प्रकरणी आतापर्यंत अनेकांवर फसवणुकीचे गुन्हे शेवगाव पोलिस ठाण्यात दाखल झालेले आहेत. गुन्हे दाखल झालेल्या काही आरोपींना शेवगाव पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेने पकडले आहे.

### नगरमध्ये झाले आहेत ३ गुन्हे दाखल

नगरमध्ये शेअर मार्केटमध्ये ज्यादा परताव्याच्या आमिषाने फसवणूक झाल्याप्रकरणी ३ गुन्हे दाखल झालेले आहेत. एका टोळीने नगर शहरासह राज्यभरातील २६ गुंतवणूकदारांची १३ कोटी ४९ लाखांची फसवणूक केल्याचा गुन्हा ऑगस्ट २०२४ मध्ये तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल आहे. त्यानंतर ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात ऑनलाईन शेअर ट्रेडिंगच्या माध्यमातून एका डॉक्टरची ४७ लाखांची फसवणूक केल्याचा गुन्हा सायबर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेला आहे. त्या पाठोपाठ नोव्हेंबरमध्ये नगर तालुका पोलिस ठाण्यात एका तरुणाची ४ लाखांची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यांचा अजून तपास लागलेला नाही.

### १३.६१ लाखांची फसवणूक, श्रीगोंद्यात दोघांवर गुन्हा दाखल

शेअर मार्केटमध्ये लाखाची गुंतवून करा आणि दरमहा १० हजार देण्याचे अवाजवी आमिष दाखवून दोन भामट्यांनी लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना श्रीगोंद्यात घडली असून, याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल साहेबराव काळे (रा.आढळगाव, ता.श्रीगोंदा) व किशोर हरिचंद्र नवले (रा. चांदा बु., ता. कर्जत) अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत.

या दोघांनी संगनमताने जानेवारी ते जून २०२४ पर्यंतच्या कालावधीत तालुक्यातील शेडगाव येथील किराणा दुकानदार संजय साहेबराव बेलेकर (वय ४२) यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करुन प्रतिलाख १० हजार रुपये प्रतिमहिना याप्रमाणे परताव्याचे आमीष दाखवुन त्यांचा विश्वास संपादन करत १५ लाख रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. मात्र कोणताही परतावा मिळवून दिला नाही. त्यामुळे परताव्याबाबत शंका निर्माण झाल्याने फिर्यादी बेल्हेकर यांनी परत पैसे मागितल्यावर *(उर्वरित मजकूर पान २ वर)*

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लंडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या
• स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२ साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल अँण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

वरदग्रीन्स रिसॉर्ट
बुकींग आवश्यक
निसर्गरम्य वातावरणात हुरडा पार्टी
निसर्गरम्य वातावरणात कवळ्या लुसलुशीत हुरडा सोबत नाश्ता, जेवणाची हायटीची उत्कृष्ट व्यवस्था
जेवणासाठी प्रशस्त ओपन हॉल/लॉन
संपर्क सौरभ संकलेचा 9637539797

# ‘वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन’ची राज्यात अंमलबजावणी होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्णय, आता घरबसल्या करता येणार दस्त नोंदणी



मुंबई – राज्यात कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिकास राज्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता येण्यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन संकल्पना राबविण्यात येणार आहे. तसेच घरबसल्या नागरिकांना दस्त नोंदणी करण्यासाठी महसूल विषयक काही दस्त नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महसूल विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा बैठक घेतली. त्यात ते बोलत होते. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, *(उर्वरित मजकूर पान २ वर)*

आता प्रत्येक शुक्रवार व शनिवार
मोफत तपासणी उपचार
नववर्षाच्या स्वागता निमित्त रुग्णांच्या व्याधी कमी करण्या करिता नोबल हॉस्पिटल परिवारातर्फे अनोखी आरोग्य योजना...
दर शुक्रवारी
मुत्रविकार व किडनीविकार तज्ञ, शल्यचिकित्सक
डॉ. अमेय सांगळे (किडनी व मूत्रविकार तज्ञ) MBBS, M.S. (General Surgery), Mch (Urosurgery)
यांची मोफत ओपीडी
दर शनिवारी
इतर विविध व्याधींवर उपचारा करीता खालील तज्ञ उपलब्ध
डॉ. राघव पारगांवकर (मेंदू व मणके विकार सर्जन) MS Gen. Surgery, Mch Neuro Surgery
डॉ. अद्वैत गिते (मेंदू विकार तज्ञ) MD Medicine, DM Neurology
डॉ. सुशांत घुमरे (जॉईंट रिप्लेसमेंट सर्जन) MBBS, MS, (Ortho), DNB (Ortho), MNAMS
डॉ. प्रिती थोरात (नेत्रविकार तज्ञ) MBBS, DOMS, IOC
डॉ. यमिता साखरे-जाधव (किडनी विकार तज्ञ) MBBS, MD (Medicine), DNB Nephrology
* अत्याधुनिक उपचार सुविधा * ह्दयरोग विभाग * मेंदू विकार निदान व शस्त्रक्रिया विभाग * किडनी व मूत्र विकार उपचार विभाग * पोट व आतडे विकार आणि जनरल सर्जरी विभाग * अस्थिरोग, जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया विभाग * नेत्ररोग उपचार व शस्त्रक्रिया विभाग * पुर्णवेळ अतिदक्षता विभाग तज्ञ उपलब्ध
नूतन वर्षाभिनंदन २०२५
अत्यंत अद्ययावत सेवा सुविधा सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
नगर जिल्ह्यातील सर्वप्रथम, प्रशस्त व परिपूर्ण आरोग्य मंदिर
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
मोफत उपचार अधिक माहितीसाठी संपर्क : 86055 52266

एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती
इंडियन कस्तुरी
Indian Kasturi
केवल अगरबत्ती
आडते बाजार, हॉटेल सरंग समोर, अ.नगर

प्रत्येक नळाला भरपूर पाणी
Crompton, Texmo, Havells Pump
* घरगुती तसेच शेतीचे दर्जेदार पंप उपलब्ध..
* एकदा अवश्य भेट द्या!
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
9145008009 / 9822542011

२४ वे पुण्यस्मरण



स्व. पुखराजजी मगनीरामजी सोनीमंडलेचा
स्व. दि. ९/१/२०००
जाने वाले अपने पीछे एक ऐसी जगह
खाली छोड जाते है
जिसे भर पाना बहुत ही मुश्किल होता है ।
* दु:खांकित *
मे. ए.पी. सोनीमंडलेचा (माकावाला)
एवम् सोनीमंडलेचा परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## भारतीय जीवनाची सार्थकता – तपश्चर्या –

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

तपश्चर्या म्हणजे कुठल्यातरी विशिष्ट उद्देशासाठी करायचं स्वयं अध्ययन असतं. तपश्चर्या हा शब्द आपल्यासाठी इतका परिचयाचा झाला आहे की तो फक्त माहिती असतो म्हणून कोणीही उच्चारला तरी तो समजल्याचा भास आपल्या बुद्धीला होतो म्हणून कोणीही उच्चारला तरी तो समजल्याचा भास आपल्या बुद्धीला होतो.

तपश्चर्येचा संबंध त्यागाशी आहे. त्याग हा तपश्चर्येचा प्रथम चरण तर द्वितीय चरण तप आहे. तप करणारानं प्रथम त्याग करायचा असतो. तो त्याग आपल्याला सहज प्राप्त असलेल्या सुखसुविधांचा, सभोवतालच्या अनुकूल वातावरणाचा असतो. आपल्याशी बद्ध असलेल्या आप्तांचा, आवश्यकतांचा आणि सवयींचा असतो.

या सगळ्या बाह्य आणि भौतिक बाबींचा त्याग करणं सुलभ व्हावं म्हणून तपश्चर्या करणारी व्यक्ती बहुधा रानावनात, डोंगरात किंवा हिमालयाच्या कुशीत जाऊन राहते. ज्यांना शक्य आहे ते हा त्याग स्वतःच्या निवासस्थानी देखील करू शकतातय



एखादी गोष्ट जेव्हा उपलब्धच नसते तेव्हा ती त्यागणं शक्य असतं, पण जेव्हा सहज उपलब्ध आहे, आपल्यासाठीच आहे, तरीही तिचा त्याग करायचा आहे. अशाही परिस्थितीत ते त्यागणं अत्यंत कठीण असतं. त्यासाठी आत्मसंयमन व दृढनिश्चयाची गरज असते.

तपश्चर्या सफल झाली की नाही हे ज्याचं त्याला जाणवतं. त्याची कोणी परीक्षा करू शकत नाही. ज्याचं त्यालाच कळतं तपश्चर्या फलद्रुप झाल्याचं!

# कोतवाली हद्दीतील अवैध धंदे बंद करता का? महिलांना रस्त्यावर उतरण्याची वेळ आणता!

### पोलीस महानिरीक्षकांसमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा



नगर – अनेकांचे संसार उध्वस्त होण्यास कारणीभूत ठरत असलेल्या शहराच्या कोतवाली हद्दीतील अवैध धंदे बंद करता का? महिलांना रस्त्यावर उतरण्याची वेळ आणता! या आर्तहाकेने प्रश्न उपस्थित करुन शहरातील अवैध धंदे बंद करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. तर अवैध धंद्यांना अभय देणारे कोतवालीच्या पोलीस निरीक्षकांची बदली करावी व कोतवाली हद्दीतील अवैध धंदे बंद न झाल्यास पोलीस महानिरीक्षकांसमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

रिपाइंच्या वतीने कोतवाली हद्दीत सुरु असलेले गांजा, हातभट्टी, मटका, जुगार, बिंगो, सोरट, मावा आदी अवैध धंदे बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. महिला आघाडीच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालया समोर उपोषण करुन देखील संबंधित अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही. कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे सर्रासपणे सुरू आहेत. त्यावर पोलीस प्रशासन कोणतेही ठोस कारवाई करत नाही. अवैध धंद्यांमुळे गुन्हेगारी वाढून अनेकांचे संसार आणि युवकांचे जीवन उध्वस्त होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अवैध धंद्यावाल्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासले जात असल्याने त्या धंद्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप महिला घाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार यांनी केला आहे. तर कोतवाली हद्दीतील अवैध धंदे बंद न झाल्यास पोलीस महानिरीक्षकांसमोर ठिय्या आंदोलन करण्याचे म्हंटले आहे.

# अवजड वाहनांना बंदी घालण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार

नगर – केडगाव नेप्ती रोड लगत अनेक मोठं मोठी उपनगरे तयार झालेली आहेत. तेथील नागरिकांना येण्या जाण्याचा नेप्ती रोड हा एकमेव मार्ग आहे. तसेच नेप्ती कांदा मार्केट या मार्गावरच असल्याने मोठं मोठ्या अवजड वाहनांची वाहतूकही याच मार्गाने होत असते, तसेच या भागामध्ये, क्लासेस असून सदर रोडने जेष्ठ नागरिक फिरण्यासाठी जात असतात. अनेक वर्षांपासून रखडलेले या रोडचे कामही आता पूर्ण झाले असल्याने व बायपास रोडचा टोल नाका सुरु झाल्याने टोल वाचवण्यासाठी अनेक वाहनचालक या रोडचा वापर करताना दिसत आहे. परिणामी वाहतूक वाढली असून अपघात होऊन दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे. तरी वाहतूक शाखा व पोलिसांनी या रोडने होणारी अवजड वाहतूक तातडीने थांबवण्यात अथवा पर्यायी रोडने त्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तसे न झाल्यास नागरिकांसह मोठ्या प्रमाणात उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा केडगाव शिवसेना (ठाकरे गटाचे) विभाग प्रमुख संग्राम कोतकर यांनी दिला आला आहे.



केडगाव नेप्ती रोड (अर्चना हॉटेल) ते विश्वयनराजेनगर बायपास चौक, रोडने कृषी उत्पन्न बाजार समिती कांदा मार्केटला जाणाऱ्या अवजड वाहनांना बंदी घालण्यात यावी अशा मागणीचे निवेदन केडगाव शिवसेना विभाग प्रमुख संग्राम कोतकर यांनी शहर वाहतूक पोलिस निरीक्षक यांना दिले आहे.

प्रभाग क्रमांक १६ च्या माजी नगरसेविका सुनीता संजय कोतकर यांच्यावतीने शहर वाहतूक शाखाचे पोलिस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे.

# नगरच्या सिटी केअर हॉस्पिटलमध्ये बांधकाम कामगारांना 'मोफत उपचार सुविधा' उपलब्ध

नगर – तारकपूर परिसरातील सिटी केअर हॉस्पिटल येथे शासनाच्या योजने अंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मोफत उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्डधारक बांधकाम कामगारांना सर्व आजाराची तपासणी, शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध झाल्या असून अनेक रूग्ण सिटी केअर हॉस्पिटल मध्ये या योजनेचा लाभ घेत आहेत, अशी माहिती हॉस्पिटलचे संचालक तथा अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. संदीप सुराणा यांनी दिली.

राज्य शासनाने बांधकाम कामगारांना आरोग्याची हमी देणारी योजना सुरू केली आहे. या अंतर्गत सिटी केअर हॉस्पिटल येथे बांधकाम कामगारांना मोफत सीटी स्कॅन, एम आर आय, सोनोग्राफी अशा विविध तपासण्या करता येतील.

याशिवाय मेंदू, मणके, हृदय तसेच शस्त्रक्रिया ही मोफत केल्या जाणार आहेत. सिटी केअर हॉस्पिटलमधील अत्याधुनिक उपचार सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांची टीम यामुळे असंख्य रूग्णांना लाभ होत असतो. शहर व ग्रामीण भागातील रूग्ण आवर्जून या सुविधांचा लाभ घेत असतात. आता बांधकाम कामगारांना या सर्व अत्याधुनिक उपचार सुविधा मोफत उपलब्ध झाल्या असून याचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मनपाच्या बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना राबविण्यास शासनाची मान्यता


### सर्व वयोगटातील महिलांसाठी मल्टीस्पेशालिटी सुविधा उपलब्ध करणार : आयुक्त यशवंत डांगे

नगर – महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना राबवण्यासाठी राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे लवकरच स्त्री रोग व बालरोग विभाग सुरू करून त्या अनुषंगाने विविध उपचार, शस्त्रक्रिया, तपासण्या उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे मोफत रुग्ण सेवा उपलब्ध करून दिली जाते. अहिल्यानगर शहरासह जिल्हाभरातील गर्भवती महिलांना या सेवेचा लाभ मिळतो. त्यामुळे या दवाखान्यात महिलांसाठी आणखी आरोग्य सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून दवाखान्यात महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना लागू करण्यासाठी, शासनाच्या पॅनलवर दवाखान्याचा समावेश होण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे शासनाने या दोन्ही योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. अ वर्ग रुग्णालय म्हणून उपचारासाठी १०० टक्के पॅकेज दरानुसार या दवाखान्यातून आता सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सद्यस्थितीत दवाखान्यात केवळ सुतीका गृह सुरू आहे. आता रुग्णसेवेचा विस्तार करून, या ठिकाणी स्त्रियांसाठी मल्टीस्पेशलिटी सर्व सेवा सुविधा सुरू करण्यात येणार आहेत. स्त्रीरोग विभाग, बालरोग विभाग, मेडिसिन विभाग, सर्जरी विभागाशी संलग्न सेवा, यात आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभाग, विविध शास्त्रक्रिया अशा सर्व सेवा–सुविधा सर्व वयोगटातील महिला रुग्णांसाठी उपलब्ध असणार आहेत. यासह सोनोग्राफी, लॅबोरेटरी, एक्स–रे सुविधा उपलब्ध असणार आहेत. या योजनेच्या मान्यतेसाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी शासनस्तरावर विशेष प्रयत्न करून मान्यता मिळवली आहे. या सेवेचा लाभ अहिल्यानगर शहरातील सर्व महिलांनी मिळणार असल्याचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले.

## अशोक भुजबळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नागरदेवळे, भिंगार येथील रहिवाशी अशोक (अण्णा) गोविंदराव भुजबळ (वय ७७) यांचे ८ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ९ जानेवारी रोजी भिंगार, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात एक भाऊ, पुतणी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हॉटेल 'जलसा' चे संचालक चंद्रशेखर भुजबळ व रजनीश भुजबळ यांचे ते वडिल, नागरदेवळेचे माजी उपसरपंच रोहित भुजबळ यांचे चुलते होत.

## संजय (नाना) सत्रे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भुतकरवाडी परिसरातील रहिवासी संजय (नाना) विजय सत्रे (वय ४८) यांचे ९ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, भाऊ, बहिण असा परिवार आहे. संजय सत्रे हे डॉ. रणजित सत्रे यांचे बंधू तर माजी नगरसेविका योगीता सत्रे यांचे दीर होत.

## रामराव उन्हाळे यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – गोकुळधाम अपार्टमेंट, गुरुकृपा कॉलनी, वैदुवाडी, सावेडी, अहिल्यानगर येथील रहिवाशी रामराव सदाशिव उन्हाळे (वय ८४) यांचे ९ जानेवारी रोजी सकाळी ८:३० वाजता वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मुले, सुना, मुलगी, जावई, नातु, नाती, असा परिवार आहे. रा. स्व. संघाचे स्वयंसेवक भाऊसाहेब उन्हाळे यांचे ते वडील होत.

## मोतीलाल चुडीवाल यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील साधना मेडिकलचे संचालक व दिगंबर जैन समाजचे माजी अध्यक्ष मोतीलाल फकीरचंद चुडीवाल (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, तीन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. भागचंद चुडीवाल, प्रेमचंद व रमेश चुडीवाल यांचे बंधू भरत व सचिन चुडीवाल यांचे वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जिल्ह्यात शेअर ट्रेंडिंग घोटाळ्याची व्याप्ती वाढतेय

(पान १ वरुन)

त्या दोघांनी फिर्यादीस फक्त १ लाख ३९ हजार रुपये दिले. उर्वरीत १३ लाख ६१ हजार रुपये देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे बेलेकर यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पारनेरमध्ये दोघांची ५३ लाखांची फसवणूक

शेअर ट्रेडिंग घोटाळ्याचे लोन पारनेरमध्येही पोहोचले असून शेअर ट्रेडिंग कंपनीचे ऑफिस उघडून तिघांनी दोघा व्यावसायिकांची ज्यादा परताव्याच्या आमिषाने ५३ लाख ४ हजारांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. याबाबत पारनेर पोलिस ठाण्यात बुधवारी (दि.८ जानेवारी) तिघांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. अमोल सीताराम थोरात (रा.करंदी, ता.पारनेर), पोपट भाऊ रोहकले, गुलाब भाऊ रोहकले (दोघे रा. भाळवणी, ता.पारनेर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

याबाबत शेखर विलास औटी (रा. कान्हूर रोड, पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. या आरोपींनी फिर्यादी शेखर यांच्याकडून २० जून ते २७ सप्टेंबर २०२३ या कालावधीत तर प्रवीण मच्छिंद्र पठारे यांच्या कडून २३ जुलै ते २३ सप्टेंबर २०२३ या कालावधीत पारनेर शहरातील नवीपेठ येथील स्वराज ट्रॅक्टरचे शोरूमच्या वरच्या गाळ्यात असलेल्या ए टी ट्रेडिंग कंपनीच्या ऑफिसमध्ये रोख व ऑनलाईन स्वरुपात एकूण ५३ लाख ४ हजारांची रक्कम घेतली. त्यानंतर या दोघांना त्या रकमेचा कुठलाही परतावा दिला नाही. फिर्यादी व त्यांचा साथीदार हे आरोपींना पैसे मागण्यासाठी गेले असता त्यांना शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर शेखर औटी व प्रवीण पठारे यांनी पारनेर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून तिघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नगर शहरातून शाळकरी मुलगा बेपत्ता

नगर – शाळेत जातो असे सांगून घराच्या बाहेर गेलेला १४ वर्षीय अल्पवयीन मुलगा नगर शहरातून बेपत्ता झाल्याची घटना मंगळवारी (दि. ७ जानेवारी) सकाळी ११ च्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सारस नगर परिसरात राहणारा १४ वर्षीय अल्पवयीन मुलगा नगर शहरातील माळीवाडा भागातील एका शाळेत शिक्षण घेतो. तो मंगळवारी शाळेत जातो असे सांगून घराच्या बाहेर गेला, मात्र तो शाळेत पोहोचला नाही आणि घरी ही परतला नाही. त्याचा नगर शहरात सर्वत्र शोध घेतला परंतु ती कुठेही मिळवून आली नाही. यावरून त्याचे कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी अपहरण केले असल्याची तक्रार त्याच्या आईने दिली आहे. या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुलमोहर रोडवरील कॅफेवर पोलिसांचा छापा

नगर – कॉफीशॉपच्या नावाखाली मुला मुलींना अश्लील चाळे करण्यास जागा उपलब्ध करून देणाऱ्या गुलमोहर रोडवरील पारिजात चौकातील कॅफेवर तोफखाना पोलिसांनी बुधवारी (दि.८ जानेवारी) दुपारी छापा टाकत कारवाई केली आहे. कॅफेचालक ओंकार दत्तात्रय कोठुळे (रा. भूतकरवाडी, भिंगारदिवे मळा) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवर पारिजात चौक येथील हंगरेला या कॅफेत चहापाणी अगर खाद्यपदार्थ न ठेवता आत पडदे लावून सोपे बसवून तरुण–तरुणींना अश्लील चाळे करण्याकरिता जागा उपलब्ध करून देत असल्याची माहिती तोफखाना पोलिसाना मिळाली.

या माहितीवरून पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांचे सूचनेवरून तोफखाना पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन खात्री करून छापा टाकला असता त्या ठिकाणी लाकडी कंपार्टमेंट बनवून बाहेरून पडदे लावून आतमध्ये बसण्यासाठी सोपे ठेवून मुला–मुलींना बसण्यासाठी व अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देताना कॅफेचालक ओंकार दत्तात्रय कोठुळे मिळून आला. पोलिसांनी त्यास कॉफी शॉपचा परवाना मागितला असता त्याच्याकडे कॉफी शॉपचा परवाना नसल्याचे आढळून आले. परवाना नसताना कॉफी शॉपचा बोर्ड लावून कुठलाही कॉफी पेय अगर खाद्यपदार्थ तेथे विक्री करता ठेवलेले नसल्याचे आढळून आले. यावरून पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पो.कॉ. राहुल म्हस्के यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओंकार कोठुळे यांच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२९, १३१ (क ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नेप्ती नाका परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – आई वडील व भाऊ असे कामाला गेले असता घरात एकटी असलेल्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवुन नेल्याची घटना नेप्ती नाका परिसरात मंगळवारी (दि.७ जानेवारी) रोजी सकाळी ६ ते रात्री ८ या कालावधीत घडली.

या बाबतची माहिती अशी की नालेगाव परिसरात भाडोत्री घरात राहणाऱ्या कुटुंबातील पती, पत्नी व मुलगा असे मजुरी कामाकरिता घराबाहेर गेले जाताना त्यांनी त्यांच्या १३ वर्षीय मुलीस घरातील पसारा आवरून घर सांभाळण्यास सांगितले. ते तिघे जण संध्याकाळी कामावरून घरी आल्यानंतर त्यांना त्यांची मुलगी घरात दिसून आली नाही म्हणून त्यांनी तिचा नगर शहरात सर्वत्र शोध घेतला परंतु ती कुठेही मिळवून आली नाही. यावरून त्या मुलीचे कुणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी अपहरण केले असल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी बुधवारी (दि.८ जानेवारी) रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम १३७ (२) नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## घरात कुजलेल्या अवस्थेत आढळला वृद्धाचा मृतदेह

नगर – नगर शहरातील स्टेशन रोडवर आनंदनगर परिसरात एका वृद्धाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत त्यांच्या राहत्या घरात बुधवारी (दि.८ जानेवारी) दुपारी ४ च्या सुमारास आढळून आला आहे. अशोक मोतीलाल मंत्री (वय ६१) असे मयताचे नाव आहे.

मयत अशोक मंत्री हे अविवाहित होते. ते घरात एकटेच राहात होते. त्यांना १ भाऊ, २ विवाहित बहिणी, पुतणे, भाचे आहेत. त्यांच्या नांदगाव शिंगवे येथे राहणाऱ्या बहिणीशी ते रविवारी फोनवर बोलले होते. त्यानंतर ३ दिवस त्यांचा कोणाशीही संपर्क झालेला नव्हता. बुधवारी दुपारी त्यांच्या शेजारी राहणाऱ्यांना त्यांच्या घरातून दुर्गंधी येवू लागल्याने त्यांनी त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क केला. त्यांचे नातेवाईक आल्यावर त्यांनी घराचा दरवाजा उघडून पाहिला असता अशोक मंत्री यांचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती देण्यात आली. कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन'ची राज्यात अंमलबजावणी होणार

(पान १ वरुन)

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस बैठकीत म्हणाले, राज्यातील जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई – मोजणी राज्यात लागू करण्यात येणार आहे. पासपोर्ट कार्यालयाप्रमाणे भूमी अभिलेख विभागातील सर्व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रथम टप्प्यात ३० कार्यालयांमध्ये भू प्रमाण केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील वडिलोपार्जित जमिनीवर स्थायिक असलेल्या लोकांना आता त्यांच्या जमिनीचे स्वामीत्व अर्थात मालमत्ता कार्ड मिळावे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महत्वपूर्ण स्वामीत्व योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत गावातील मिळकतींचे ड्रोन द्वारे जीआयएस सर्वेक्षण आणि गावठाण भूमापन करण्यात येणार आहे. पी एम किसान नोंदणीकृत शेतकऱ्यांचे ओळख क्रमांक तयार करण्यात येणार आहेत.

### भूसंपादन प्रक्रिया लवकरच ऑनलाईन करण्यात येणार

या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे, जनतेला वाळू सहज उपलब्ध होण्यासाठी सुलभ वाळू धोरण आणण्यात येईल. लवकरच भूसंपादन प्रक्रिया ऑनलाईन करण्यात येणार असून यासाठी पोर्टल तयार करण्यात येणार आहे. रेडीरेकनरचे दर पीडीएफ स्वरुपात राहते मात्र हे दर आता गावनिहाय, प्लॉटनिहाय मिळविता येणार आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठी अधिमूल्य व कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी नियम बनविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

महसूल विभागातील चार कॅडरची संपूर्ण माहिती पोर्टलवर आणण्यात येणार असून महसूल अधिकाऱ्यांसाठी मॅन्युअल तयार करण्यात येणार आहे. केंद्राच्या 'अभिनव पहल' या पोर्टलमध्ये राज्यातील अधिकाऱ्यांच्या चांगल्या प्रॅक्टिस टाकण्यात येत आहे. नवीन जिल्हा करताना प्रशासकीय यंत्रणा यापूर्वीच तयार करावी. संपूर्ण यंत्रणेला अतिरिक्त स्वरूपात तयार करून ठेवावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी मोसंबी

मोसंबी असे एक फळ जे आपल्या आंबट चव आणि सुगंधाने सर्वांना आकर्षित करते. हे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. हे शरीराला संसर्गापासून वाचवण्यास मदत करते. त्याचबरोबर पाचन सुधारण्यासही मदत होते.

## पाककला

### ऑरेंज केक

**साहित्य :** दोन वाट्या मैदा, पाऊण वाटी लोणी, एक वाटी साखर, तीन अंडी, पाव चमचा मीठ, दीड सपाट चमचा बेकिंग पावडर, एक संत्रे.

**कृती :** साखर व लोणी एकत्र करून पांढरा रंग येईपर्यंत फेसावे. नंतर त्यात अंड्यातील बलक थोडा थोडा व वरचेवर ढवळत ढवळत घालावा. मैदा, मीठ व बेकिंग पावडर एकत्र करून चाळणीतून चाळून घ्यावे. संत्र्याची साल किसून घेऊन ती त्यात घालावी. तसेच संत्र्याचा रस व वरील तयार करून घेतलेले लोणी व साखर यांचे मिश्रण मैद्यात घालावे व पीठ एकजीव होईल, असे कालवून घ्यावे. नंतर केकच्या भांड्याला आतून तुपाचा हात लावून, त्या भांड्यात तयार केलेले पीठ घालावे व ते भांडे ओव्हनमध्ये ठेवून मंद आचेवर केक भाजून घ्यावा.

## वास्तू

### शाळेच्या इमारतीचा जिना

इमारतीचा जिना नैऋत्य किंवा वायव्येत घेणे चांगले. सर्व क्लासरूम्सना प्रवेशद्वारे उत्तर ते पूर्वेत असावीत. प्रत्येक वर्गात फळा म्हणजेच शिकवताना विद्यार्थ्यांची तोंडे पूर्व ते उत्तर दिशेत असणे अत्यावश्यक असते. त्यामुळे विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती व एकाग्रता तल्लख राहते व अभ्यासाचे आकलन चांगल्या प्रकारे होते.

## सल्ला

अनरसे तळून झाल्यावर ते पोह्यांवर टाकावेत, म्हणजे त्यातील तूप पोह्यांत उतरते व ह्या पोह्यांचा चिवडा केल्यास चिवड्याकरिता तूप फार घालावे लागत नाही.

## सौंदर्य

आजकाल समारंभात, लग्नात नववधूसाठी आय-लॅशेस वापरल्या जातात. त्याने पापण्या मोठ्या व सुंदर दिसतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५

**पुत्रदा एकादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, कृत्तिका १३।४६, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ होईल. तुमची मन:शांती ढळेल.

**वृषभ** : तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. सांपत्तिक स्थिती सुधारेल.

**मिथुन** : मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. नव्या कल्पना प्रत्यक्षात उतरवाल.

**कर्क** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. जुने मित्र व नातेवाईक भेटतील.

**सिंह** : निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यश मिळेल.

**कन्या** : सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हाल. आईल. तुमच्या खासगी आयुष्यात मित्र प्रमाणाबाहेर हस्तक्षेप करतील.

**तूळ** : आजच्या दिवशी तुम्ही प्रेमपाशात बांधले जाणार आहात. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**वृश्चिक** : तुमच्या नवीन योजना, प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांचा विश्वास संपादन कराल.

**धनु** : पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल.

**मकर** : अन्य देशांतील लोकांशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित होतील.

**कुंभ** : जुनी मित्र भेटतील. महत्त्वाच्या आवश्यक गोष्टींचीच आज खरेदी कराल.

**मीन** : कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी यांच्यासाठी खर्च कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## चिठ्ठ्या

काम भरपूर असल्यामुळे गॅरेजचा मालक मोटीरीवर मालकाचे नाव आणि गाडीचे काय बिघडले आहे त्याच्या चिठ्ठ्या सोयीसाठी लावून ठेवत होता. श्री. तिवारी यांचे त्या चिठ्ठीवर लक्ष गेले. त्यावर लिहिले होते - श्रीमती वर्मा - चालू होत नाही. मेहता शेट - धुवून काढणे. श्रीमती खन्ना - करंट येत नाही.

मनातल्या मनात हसत श्री. तिवारी आपल्या मोटारीजवळ आले तेव्हा तिच्यावर चिठ्ठी लिहिली होती श्री. तिवारी - आत खूप घाण आहे.

# जागतिक आश्चर्ये

## ग्रेट हॉल ऑफ पिपल (चायना)

ग्रेट हॉल ऑफ पिपल ऑफ चायना या इमारतीचे प्लॅनिंग व डिझाईन झँग बो या तंत्रज्ञाने तयार केले होते. या इमारतीत १,७१,८०० चौमी. इतकी जागा मुख्य हॉलमध्ये वापरली गेली आहे. ती वापरात असलेली जागा ३५६ मिटर लांब आणि २०६ मिटर रुंद आहे. चायनीज लोकांच्या काँग्रेसचा कारभार येथून चालतो.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११७१

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ३ | | ■ |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | ४ |
| ■ | ■ | ५ | | | ■ | ६ | |
| ७ | ■ | | ■ | ■ | ८ | | ■ |
| ९ | | ■ | १० | ■ | ११ | | १२ |
| | ■ | ■ | १३ | १४ | | ■ | |
| ■ | ■ | १५ | ■ | | ■ | १६ | |
| १७ | | | | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) +++++ +++ चले जायेंगे (गाणे) ५) +++ कुलकर्णी (अभिनेत्री) ६) 'शोले' नंतर काढलेला जी. पी. सिप्पी, रमेश सिप्पी यांचा चित्रपट ८) 'शोले'मधील अमिताभ बच्चनचे नाव ९) बिवी नंबर ++ (चित्रपटाचे नाव) ११) पूर्वीच्या काळातील एक दिवंगत खलनायक +++ पुरी १३) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक गाजलेला चित्रपट १६) ++ नाम जोकर (चित्रपटाचे नाव) १७) सलमानखान, चाँदनी, डॅनी, प्राण यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) ++ ऑफ इंडिया (चित्रपटाचे नाव) २) ++++ डोरी (चित्रपटाचे नाव) ३) गीत ++ पत्थरोंने (चित्रपटाचे नाव) ४) दिलीपकुमार, नादिरा, निम्मी यांचा एक चित्रपट ६) +++ मेरे शादी का खयाल दिल मे आया है इसीलिये मम्मीने मेरे (गाणे) ७) राज कपूर, नर्गिस यांचा एक चित्रपट ८) गंगा +++ (चित्रपटाचे नाव) १०) ++ मेमसाब (चित्रपटाचे नाव) १२) राज कपूर, वैजयंतीमाला, उषा किरण यांचा एक चित्रपट १४) +++ कपूर ('राम तेरी गंगा मैली'चा नायक) १५) ++ और शाम (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आहारात 'सत्व', वागण्यात 'तत्व', आणि बोलण्यात 'ममत्व' असेल तरच जीवनाला 'महत्त्व' येते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## सूर्य केव्हा विझेल?

सूर्य हा तारा आहे. त्यामुळे कधी ना कधी तरी इंधन संपून त्याचा अंत होणार हे निश्चित. शास्त्रज्ञांनी हा अंतःकाल कधी ओढवणार हे जाणून घेण्यासाठी काही गणिते केली आहेत. सूर्याकडून आपल्याकडे येणारा प्रकाश व उष्णता हे सूर्याच्या गर्भात चालू असलेल्या औष्णिक-आण्विक प्रक्रियांचे परिणाम आहेत हे तर आता शास्त्रज्ञांना कळले आहेच; पण त्याचबरोबर सूर्यात हजर असलेले हायड्रोजनचे अणू एकत्रित येऊन त्यांच्यामुळे हेलियम अणूंची निर्मिती होते, हे या प्रक्रियेचे स्वरूपही आता शास्त्रज्ञांना ठाऊक झाले आहे. या प्रक्रियेत निर्माण झालेल्या ऊर्जेच्या १ टक्का ऊर्जा पृथ्वीवर येऊन पोहोचते.

ज्या दिवशी सूर्यातला हायड्रोजन अणूंचा साठा हळूहळू संपुष्टात येईल तेव्हा आपोआपच सूर्य विझू लागेल. अजून तरी काही अब्ज वर्षे हा साठा संपणार नाही, सूर्याच्या आकाराच्या ताऱ्याचे सर्वसाधारण आयुष्य १० अब्ज वर्षांचे असते असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यांतली ५ अब्ज वर्षे झाली. तेव्हा अजून ५ अब्ज वर्षे तरी सूर्य विझणार नाही हे नक्कीच.

## निश्चय

एका शाळेत एक मुलगा शिकत होता. त्याच्या वर्गातली सर्व मुले हुशार होती. गुरुजींनी शिकवलेले ध्यानी घेऊन ती पटापट अभ्यास करायची आणि वर्गात गुरुजींची शाबासकी मिळवायची. त्या विद्यार्थ्यांमध्ये एक विद्यार्थी होता. तो अतिशय मठ्ठ होता. त्याला गुरुजींनी खूप चांगल्याप्रकारे शिकवून पाहिले. त्याची अभ्यासात प्रगती होत नव्हती. परंतु वर्गातल्या विद्यार्थ्यांना देखील हे कळून चुकले होते की, हा विद्यार्थी मठ्ठ आहे. म्हणून सारे विद्यार्थी त्याला ढ, ढ म्हणून चिडवत असत. त्या गोष्टीचे त्या मुलाला फार वाईट वाटत असे. परंतु तो तरी बिचारा काय करणार ?

एकदा वर्गातल्या विद्यार्थ्यांची परीक्षा झाली. तो ढ विद्यार्थीही परीक्षेला बसला होता. जेव्हा निकाल लागला तेव्हा त्या विद्यार्थ्याला फारच कमी गुण पडले. ते बघून गुरुजी चिडले. त्यांनी त्या मठ्ठ मुलाला अक्षरशः बदडून काढले आणि म्हणाले, 'मूर्खा, तुझ्यासमोर कितीही मोठा गुरुजी आला तरी तो तुला शिकवू शकणार नाही. अरे, एखादा गाढव तरी शिकून शहाणा होईल, पण तू शिकू शकणार नाहीस.'

आपल्या गुरुजींचे हे उद्गार ऐकून तो विद्यार्थी खूप नाराज झाला. त्याला अक्षरशः रडू कोसळले. आता आपण घरी न जाता सरळ नदीत उडी घेऊन जीव द्यावा, असे त्याच्या मनात आले.

तो तडक रागारागात नदीच्या काठावर आला. एका खडकावर उभा राहून पाण्यात उडी घेणार तोच त्याचे लक्ष एका खडकाच्या बारीक कपारीतून उगवलेल्या तो छोट्या रोपाकडे गेले. ते झाड खडक फोडून वर आले होते. मुलाच्या मनात विचार आला. एवढा कठीण खडकही जर इवलेसे रोप फोडते, तर मग मी हुशार का होणार नाही?

तो मुलगा तात्काळ माघारी वळला. त्याने अभ्यासाचा निर्णय घेतला होता. कालांतराने तो हुशार विद्यार्थी गणला जाऊ लागला. पुढे नामांकित झाला. तोच गणिती रामानुजन!

तात्पर्य : प्रयत्नाने असाध्य ते साध्य होते.

# रहमते दर्शन (भाग - १)



संत दर्शनसिंह जी महाराज एक पूर्ण पुरुष थे। इसका आभास हमें महाराज जी के महाराष्ट्र में दौरे पर हुआ। हमें एक सत्संगी भाई ने बताया था कि महाराज जी संत नामदेव जी और संत तुलसी साहब सरीखे संत हैं। ऐसे महापुरुष के दर्शन करने की इच्छा मेरे मन में और बलवती हो उठी। तेरह-चौदह भाई-बहन नासिक से आये हुए थे। महाराज जी का सत्संग मालेगाँव में होना था। महाराज जी आये और जब मैंने उनके दर्शन किये, तो उनकी साधारण पोशाक देखकर मन में शंका हुई कि ये संत कैसे हो सकते हैं? खैर ! हम सत्संग में बैठ गये और महाराज जी सत्संग फरमाने लगे। मेरे आश्चर्य का ठिकाना नहीं रहा, जब महाराज जी का स्वरूप नामदेव जी के स्वरूप में बदल गया। इससे मुझे अत्याधिक प्रसन्नता हुई और मेरा विश्वास पक्का हो गया कि महाराज जी ज़रूर कोई महापुरुष हैं। अगले दिन नामदान था। बहुत से भाई-बहनों को नामदान मिला और उन्हें अनेक प्रकार के अनुभव हुए।

## मौत के पंजे से छुड़ाना

एक बार हम कुछ भाई-बहन महाराज जी के जन्मदिन, १४ सितम्बर को दिल्ली आये हुए थे। अगले दिन यानी १५ सितम्बर को हमने एक प्राइवेट बस द्वारा ऋषिकेश जाने का प्रोग्राम बनाया। रास्ते में हम सब बस में सो गये। बीच में एक बार मेरी आँख खुली तो देखा कि बस अचानक एक खाई की तरफ बढ़ रही है। मैंने घबराकर बड़े ज़ोर से महाराज जी से प्रार्थना की, हे महाराज जी, हमें बचा लो। आवाज़ सुनकर सभी जाग गये और बस भी एक झटके के साथ किसी पेड़ से टकराकर वहीं रुक गई। हम सब एक-दूसरे के ऊपर गिर गये लेकिन किसी को ज़्यादा चोट नहीं आई। हम सब घबराकर बस से बाहर निकले। बाहर आकर घायलों का उपचार किया गया। वहाँ पर काफी लोग इकट्ठे हो गये और सभी ने एक स्वर में हमें यही बताया कि यहाँ पर जितनी भी बसें गिरीं, उनका कोई भी यात्री जीवित नहीं बचा। आप लोगों पर परमात्मा की असीम कृपा है। हमने कहा कि हमारे परमात्मा तो संत दर्शनसिंह जी महाराज हैं और उनकी कृपा से ही आज हम मौत के पंजे से बच गये।

ऐसे थे हमारे परम प्रिय दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज, जो हमारे संग हर समय अपने सूक्ष्म रूप में रहते हैं और हमारा विश्वास बरकार रखते हैं।

## वे अन्तर्यामी थे

मैंने संतों के बारे में सुना तो बहुत था, परन्तु किसी महापुरुष दर्शन नहीं किये थे। दिल्ली, साकेत में रहते हुए मेरी मुलाकात एक ऐसे सज्जन से हुई, जो किसी संत के पास जाया करता था। मेरे आग्रह करने पर उन्होंने मुझे कृपाल आश्रम में संत दर्शनसिंह जी महाराज के दर्शन कराने का वायदा किया। आश्रम पहुँचने के बाद मेरी मुलाकात जैन साहब से हुई। मैंने अपनी जिज्ञासा से उन्हें अवगत कराया। जैन साहब ने मुझे महाराज जी से मिलने का वादा करके एक कमरे में बिठा दिया। मैं दो घंटे तक बैठा हुआ यह सोचता रहा कि संत तो दिलों की जानते हैं और यदि पूर्ण संत हुए तो मुझे खुद ही बुला लेंगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

सहज विधियां खोज निकाली थी। वह दिमाग की कार्य प्रणाली जानते थे। हम जो कुछ भी पढ़ते, लिखते, देखते या सुनते हैं, दिमाग उसका अपने ढंग से कोई चित्र बना कर रेकोर्ड कर लेता है। हजारो वर्ष पहले ज्ञान जबानी सुनाया जाता था। वह लोगों को याद रहता था। जो याद रखना होता था उसका चित्र बना दिया जाता था। चित्र से याद रहता था कि इस का क्या अर्थ था। दूसरा ज्ञान को कहानी का रूप दे देते थे। कहानी सहज याद रहती है। इस लिये जो भी याद रखना हो उसका अपने ढंग से रेखाचित्र बना लें या उसे एक कहानी का रूप दे देवें। दिमाग की और भी विशेषताएं हैं। जब हमारे दिमाग का बांया और दायां हिस्सा एक साथ कार्य करते हैं तो मनुष्य आश्चर्यजनक चीजे करने लगता है।

जब हम कल्पना करते हैं तो दिमाग के दोनों हिस्से एक साथ कार्य करने लगते हैं। जब हम कल्पना करते हैं तो हमारा अवचेतन मन डायरेक्ट कार्य करने लगता है। जब हम गहन ध्यान में होते हैं तब भी दिमाग के दोनो हिस्से कार्य करने लगते हैं। अगर ध्यान में रस नहीं आ रहा तो समझो दिमाग

## दिमाग की शक्ती

का एक हिस्सा ही कार्य में लगा हुआ है। दिमाग के इन गुणों का लाभ लेना चाहिए। स्मरण करने योग्य चीजो को या भाषण को या लक्ष्यों को अजीबो गरीब शक्ल सूरत या उट पटांग शब्द या वाक्य शब्द का जामा पहना दो। कोई न कोई आकृति बना दो। आकृति को देखते ही सब याद आ जाएगा। जो आकृति बनाई है उसमे कोई न कोई रंग भर दो। जब रंग भरते हैं तब भी दिमाग के दोनो हिस्से कार्य करते हैं। जब दिमाग के दोनों हिस्से कार्य करते हैं तो उस समय दिमाग की शक्ति बढ़ जाती है। हमें बहुत गहरे तल पर पड़ी चीजें भी याद आने लगती हैं। आंखे और स्मृति

हम जो कुछ भी पढ़ते सुनते या करते हैं दिमाग उन सब के चित्र बना कर स्मृति में रख लेता है। अगर हम सभी चीजो का या बातों का सोच कर कोई चित्र बनाते हैं तो उसे सहज ही याद रख सकते हैं। जो चित्र बनाया है उसे गति दो। उसे चलता फिरता या दौड़ता हुआ बनाएं। दो लड़ते हुए व्यक्ति ज्यादा याद रहते हैं। खड़ा हुआ व्यक्ति ज्यादा याद नहीं आता । फिल्मे ज्यादा याद रहती हैं। नाटक ज्यादा याद रहते हैं। चलते हुए जीव जंतु, चलती हुई गाड़ियां ज्यादा याद रहती हैं। जो भी याद रखना चाहते हैं उसे पांच इन्द्रियों से जोड़ें। हम जीवन में ५ इन्द्रियों के सहयोग से कार्य करते हैं। ये इन्द्रियां हैं, आंख, नाक, कान, मुख और स्पर्श । आंखे

जो चीजे हम आंखो से देखते हैं वह हमें सहज ही याद आती रहती हैं। उसके लिये मेहनत नहीं करनी पड़ती। जो चीज याद रखनी है, उसे देखते ही दिमाग में कोई शक्ल बना लो, या कोई फूल, पेड़, कार आदि बना लें।

कोई भी बुक पढ़ें उसके अंदर सभी पायंट्स की आकृति बना लें। ऐसे ही आध्यात्मिक शक्तियों का मन में चित्र बना लें। सर्व सम्पन्न बनना है तो मन में लक्ष्मी नारायण का चित्र देखते रहो । स्वर्ग गुण का चित्र मन में देखते रहो। शिव बाबा, ब्रह्मा बबा या किसी ईष्ट का चित्र मन में देखते रहो।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

मधुमेह व रक्तदाब वाढलेल्या गर्भवतीचे बालक मृतावस्थेत जन्मण्याचा धोका असतो. गर्भावस्था ही एक नैसर्गिक सामान्य अवस्था आहे. ती नैसर्गिक आयुर्वेदिक उपचार पदतीने प्राकृतच ठेवली पाहिजे. Precaution is better than cure. या उक्तीप्रमाणे रोग होण्यापेक्षा तो होऊ नये यासाठीच काळजी घ्यावी. तसेच वर सांगितलेले सर्व आजार प्रत्येक गर्भवती स्त्रीला होतीलच असे नाही. नैसर्गिक प्रसूती होण्यासाठी शरीरातील अपानवायूचे कार्य प्राकृत अवस्थेत असणे - महत्त्वाचे असते. अपान वायूला प्राकृत अवस्थेत ठेवण्यासाठी आयुर्वेदातील काही विशिष्ट औष योजना, औषधी कल्प घेणे जरुरीचे असते. अपानवायूची जर दुष्टी झाली, तर नैसर्गिक प्रसूतीमध्ये अडचणी येऊन 'सिझेरियन' करण्याची वेळ येते. अपानवायूला अधोगती म्हणजेच प्राकृत गती मिळविण्यासाठी वातशामक चिकित्सा उपयोगी पडते.

## नवव्या महिन्यात घ्यावयाची काळजी

१) पाठीला व कमरेला हलक्या हाताने वातशामक तेलाने मसाज करावा.

२) पोटाला हळद, मंजिष्ठा, मोगरा, गुलाब यांनी सिध्द गर्भसंस्कार तेलाने किंवा साध्या खोबरेल तेलाने मसाज करावा यामुळे अपान वायूला प्राकृत गती मिळते योनीमध्ये वातशामक तेलामध्ये भिजविलेला कापसाचा पिचू ठेवावा. मलावस्तंभाची तक्रार असेल, तर पोट साफ होण्यासाठी रात्री झोपताना कोमट पाण्यातून १ चमचा त्रिफळाचूर्ण वे ज्येष्ठमध चूर्ण घ्यावे. वातानुलोमन होण्यासाठी, अपानवायूला प्राकृत गती मिळवण्यासाठी तसेच गर्भवतीची कंबर, पाठ, नितंब, माकडहाड यांचेमध्ये स्निग्धता, लवचीकता, तेथील स्नायूंना व हाडांना मजबूती येण्यासाठी वातशामक तेलाचा २० मि.ली. मात्रा बस्ती रोज घ्यावा.

४) ९ व्या महिन्यामध्ये शरीराच्या हालचाली भरपूर कराव्यात, कारण या महिन्यामध्ये प्रसूती कधीही झाली तरी चालते. नैसर्गिक प्रसूती होण्याच्या दृष्टीने पायी चालणे, फरशी पुसणे, झाडणे, आम्ही सांगितलेली योगासने, दीर्घश्वसन या गोष्टी कराव्यात; यामुळे बाळाचे डोके कटीस्थानी स्थिर होण्यास मदत होते. एवढे तर निश्चित सांगता येते की, वरील सर्व गोष्टी केल्यामुळे नैसर्गिक प्रसूतीसाठी निश्चितच फायदा होईल.

५) त्याचप्रमाणे गर्भवती रुग्णालयात दाखल झाल्यानंतर सुंठ, पिंपळी, कुष्ठ, वेलची, चित्रक, वेखंड व हिंग यांचे चूर्ण हुंगावयास दिल्याने किंवा मधातून थोडे चाटण दिल्याने नैसर्गिक पद्धतीने प्रसूती होण्यास मदत होते.

६) आदल्या रात्री एरंडस्नेह २ चमचे पिण्यास दिल्याने देखील कळा येण्यास सुरुवात होऊन नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत होते. 'नैसर्गिक प्रसुतीच्या वेळी वेदनेला न घाबरता खंबीरपणे मनाची तयारी करून मन शांत ठेवून बाळ खाली ढकलण्याचा प्रयत्न करावा.

## प्रसूतिगृह निवडताना

प्रसूतिगृहाची निवड करताना तेथील डॉक्टर, तेथील सुविधा यांचा विचार करणे फार महत्त्वाचे असते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘सर्वोत्तमाचा ध्यास’ हाच भारत व इंडियाला जोडणारा दुवा ठरेल

**पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे प्रतिपादन; ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत ध्यास सर्वोत्तमाचा या विषयावर पहिले पुष्प**

नगर – एक इंडिया आहे जो विलक्षण सधन आहे व एक भारत आहे जो रोज आपल्या दोन वेळच्या अन्नासाठी झगडत आहे. या दोन समुदायांमध्ये असलेली दरी वाढत आहे ती कमी करण्याचा दरही अत्यंत कमी आहे. ही दरी कमी करायचे असेल व या दोन समुदायांना सांधण्याचे असेल तर त्याचा दुवा ’सर्वोत्तमाचा ध्यास’ हाच ठरू शकतो, असे प्रतिपादन पत्रकार व वृत्त निवेदक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

संपदा विद्या प्रतिष्ठान, ज्ञानसंपदा स्कूल आयोजित ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत डॉ. उदय निरगुडकर यांनी ध्यास सर्वोत्तमाचा या विषयावर पहिले पुष्प गुंफले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, स्कूल कमिटीचे चेअरमन कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपुगडे आदि उपस्थित होते. हे व्याख्यानमालेचे चौदावे वर्ष आहे.



संपदा विद्या प्रतिष्ठान, ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १४ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत ज्येष्ठ पत्रकार, वृत्तनिवेदक डॉ. उदय निरगुडकर यांनी ध्यास सर्वोत्तमाचा या विषयावर पहिले पुष्प गुंफले. (छाया – उदय जोशी)

डॉ. निरगुडकर पुढे म्हणाले, हुकुमशाहीमध्ये यथा राजा तथा प्रजा असे असते मात्र लोकशाहीमध्ये यथा प्रजा तथा राजा असे असते. देश विश्वगुरू व्हावा असे स्वप्न आपण पाहत असू तर त्यासाठी जनतेला सर्वोत्तमाचा ध्यास घ्यावा लागेल. जर्मनीने इंग्लंडवर निर्णायक हल्ले केले राष्ट्राध्यक्ष विस्टन चर्चिल यांनी शरणागती पत्कारायचा निर्णय घेतला मात्र जनतेने तो धुडकावला. इंग्लंडचा झेंडा कधीही खाली पडू देणार नाही या जनतेने केलेल्या निर्धारानेच इंग्लंडला दुसऱ्या महायुद्धात विजय मिळवून दिला. समाज दुबळा आहे आणि देश बलदंड झाला असं कधीही होत नाही. जेव्हा व्यक्ती बदलेल, त्याची विचारधारा बदलेल, त्याची दैनंदिन जीवन पद्धती बदलेल त्याचवेळी खऱ्या अर्थाने परिवर्तन येईल, केवळ सत्ता बदलाने परिवर्तन येईलही पण ते वरवरचे असेल.

जपान मधील एका शाळेला आपण भेट दिली असता तेथील मॉन्टेसरीच्या पहिल्या दिवशी मुलांना वर्गात जायच्या आधी बूट काढायची शिकवण दिली जात होती त्यानंतर काही दिवसानंतर पून्हा आपण त्याच शाळेत गेलो असता तेथे शिस्त लावणारे कोणीही उपस्थित नव्हते मात्र प्रत्येक विद्यार्थी आपापले बूट व्यवस्थित काढून ठेवत होता. याचा अर्थ शिस्त म्हणजे जरब नाही. कोणीही बघत नसताना माझ्या मनाने चांगले करायचा घेतलेला ध्यास म्हणजे शिस्त. थुंकल्यास दंड केला जाईल यामुळे शिस्त येत नाही मात्र मी माझा परिसर स्वच्छ ठेवेल हा ध्यासच राष्ट्रनिर्मितीची पहीली पायरी ठरतो. आपल्याकडे ते दिसत नाही म्हणूनच लग्नामध्ये दोन रांगा असतात उजवीकडे नियम पाळणाऱ्यांची व डावीकडे नियम मोडून पुढे जाणाऱ्यांची दुर्दैवाने आम्ही त्यांना व्हीआयपी म्हणतो. जगभरात कुठेही असे व्हीआयपी कल्चर दिसत नाही. सर्वांना समान वागणूक असल्यामुळे तेथेच राष्ट्र सर्वप्रथम ठरते. सर्वसामान्य माणूस त्याची भरभराट आणि त्याची परिस्थिती ही देशाच्या परिवर्तनाची निदर्शक असते.

दुसऱ्या महायुद्धात जपानची दोन औद्योगिक शहरे हिरोशिमा आणि नागासाकी बेचिराख झाली मात्र १९५० नंतर जपानने पुन्हा भरारी घेतली जर्मनी बाबतही हेच घडले. आपल्याकडे वैयक्तिक यशाचा गौरव केला जातो मात्र संघ भावनेचा गौरव करण्याची परंपरा निर्माणच झालेली नाही. प्लासीच्या लढाईत लॉर्ड क्लाईव्हच्या केवळ ३००० सैनिकांनी सिराजोद्धवलाच्या ५० हजार सैनिकांना कापून काढले. या सैनिकांमध्ये केवळ जात, धर्म, वर्ण यावरुन भेदच निर्माण केला नाही तर ज्या राष्ट्राबद्दल ते लढतात त्याबद्दल तिरस्कार निर्माण केला. संघ भावना नाहीशी झाली आणि युद्ध हरलं. मनगट पिचले, हिम्मत हरली की काय होतं ते इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. या ३ हजार लोकांनी विजयाची मिरवणूक काढली ती पाहायला २ लाखाची गर्दी पश्चिम बंगालमध्ये होती. भारताला इंग्लंडने ४५ ट्रिलियन डॉलरला लुटलं आज इतकी वर्ष प्रगती करूनही आपली अर्थव्यवस्था केवळ ४.५ ट्रिलियन डॉलरची आहे. अर्थात आपल्या खिशात १०० रुपये असतील तर १ हजार रुपये लुटले. स्वातंत्र्यापूर्वी जागतिक बाजारात आमचा वाटा २५ टक्के होता इंग्रजांनी लुटून तो आकडा थेट ४ टक्क्यावर आणून ठेवला.

आमच्याकडे छात्र तेज नव्हतं असं नाही अफगाणिस्तानपासून तुंगभद्रेपर्यंतेचा अक्राळ विक्राळ प्रदेशाचा सुलतानाने केवळ साडेचार जिल्ह्यांचे छत्रपती शिवरायांनी उभारलेलं राज्य बुडवण्याकरता २७ वर्षे ठाण मांडलं होतं. मात्र हिंदुत्वाचा एक विचार घेऊन सत्तावीस वर्ष या सुलतानाविरुद्ध झुंज दिली व त्याची कबर बांधली.

सर्वोत्तमाचा ध्यास ही एकदा करायची गोष्ट नाही ती कधीही न संपणारी बाब आहे. सर्वांना समान व परवडण्याजोगी संधी देणे यासाठी आवश्यक आहे. बेंगलोरच्या विद्यार्थ्यांनी शालेय मासिकामध्ये लिहिलेल्या लेखातून डायरेक्ट मनी ट्रान्सफर ची कल्पना घेतली गेली. प्रतिकूल परिस्थितीत समाज एकत्र येतो एकवटतो मात्र अशी परिस्थिती नेहमी निर्माण होऊ शकत नाही. प्रतिकूल परिस्थिती समोर आहे असे समजून जो समाज काम करतो तो सर्वोत्तम घडवू शकतो. इस्त्रोची कामगिरी एका अग्निबाणावर १०४ सॅटेलाईट सोडणे, कोविडमध्ये लस निर्मिती, कोविडची तपासणी किट निर्मिती अशी उदाहरणे देऊन त्यांनी आपला मुद्दा स्पष्ट केला.

संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, विश्वस्त विनोद बजाज, अविनाश बोपर्डीकर, विचार भारतीचे रवींद्र मुळे, उदयोजक अरविंद पारगावकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, अनंत देसाई, विशारद पेटकर आदी उपस्थित होता.

सूत्रसंचालन श्रीमती स्वाती तवले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय भाग्यश्री जाधव यांनी करून दिला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर यांनी केले. प्रथमतः दिवंगत उद्योजक अशोक सोनवणे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सरस्वती वंदनेने व्याख्यानाला सुरुवात झाली. आभार कैलास जाधव यांनी मानले पसायदानाने व्याख्यानाची सांगता झाली.

# ज्ञानरचना सोशल फाउंडेशनला राष्ट्रीय ध्येय गौरव पुरस्कार जाहीर

**राष्ट्रीय युवा दिनानिमित्त संस्थेचा शहरात केला जाणार सन्मान**

नगर – शैक्षणिक, सामाजिक व महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्ञानरचना सोशल फाउंडेशन या संस्थेला राज्यस्तरीय राष्ट्रीय ध्येय गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ध्येय उद्योग समूह व युवा ध्येयच्या वतीने रविवारी (दि.१२ जानेवारी) राष्ट्रीय युवा दिनानिमित्त माऊली सभागृह येथे संस्थेला पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती समूहाचे अध्यक्ष लहानु सदगीर यांनी दिली.

फाउंडेशन शैक्षणिक क्षेत्रामध्ये योगदान देऊन सुसंस्कारी व गुणवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य करत आहे. सामाजिक समतेसाठी विविध उपक्रम राबवून भावी पिढीमध्ये लोकशाहीची मुल्ये रुजविण्याचे कार्य करत आहे. सुप्रिया चौधरी, प्रविण साळवे, सारिका शेलार ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंना मदतीचा हात देण्याचे सातत्याने उपक्रम राबवित आहे. तसेच संस्थेच्या वतीने सामाजिक संस्थांना निधी संकलनासाठी व विविध मार्गदर्शनवर शिबिर आयोजित करुन सामाजिक चळवळीचा प्रचार–प्रसार केला जात आहे. संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेल्या लोककल्याणकारी कार्याची दखल घेऊन फाउंडेशन या संस्थेला राज्यस्तरीय राष्ट्रीय ध्येय गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# नगरमध्ये शनिवारी रंगणार अमृतमहोत्सवी ‘मैत्री कट्टा’

**तृतीय वर्धापनदिनानिमित्त होणार मैत्रीपूर्ण संवाद**


संजय कांबळे | नंदकुमार देशपांडे | के. नमिता प्रशांत | अभिरुची ज्ञाते

नगर – मैत्री ही कुणाशीही होऊ शकते. त्याला कोणतेही बंधन नाही. हाच धागा पकडून गेल्या दोन वर्षांपासून नगरमध्ये होत असलेल्या ‘मैत्री कट्टा’ या उपक्रमाचा तृतीय वर्धापनदिन शनिवारी (११ जानेवारी) माऊली सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता होत आहे. यावेळी ‘खास रे’फेम संजय कांबळे, लेखक व हौशी छायाचित्रकार नंदकुमार देशपांडे, चित्रकार के. नमिता प्रशांत व साहित्यिक अभिरूची ज्ञाते उपस्थित राहून रसिकांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणार आहे. त्यांच्या माध्यमातून यंदा अमृतमहोत्सवी ७५वा कट्टा रंगणार आहे.

काही मित्रांच्या संकल्पनेतून ‘मैत्री कट्टा’ हा उपक्रम साकारला गेला. त्याअंतर्गत महिन्यातून दोनदा शुक्रवारी हा उपक्रम लक्ष्मी फोटो स्टुडिओ येथे होतो. त्यात स्वतःच्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्ती आपल्या यशाच्या प्रवासाबरोबरच मैत्रीचे रंग उलगडून दाखवतात. आतापर्यंत येथे ७१ मैत्री कट्टे पूर्ण झाले. कट्ट्याच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्ताने येत असलेल्या चार प्रमुख पाहुण्याच्या रूपाने आता अमृतमहोत्सवी कट्टा होत आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहणारे ‘खास रे टिव्ही’फेम संजय कांबळे हे मराठी रॅप सिंगर असून त्यातून ते अनेक सामाजिक समस्या मांडत असतात. त्यामुळे ते लोकप्रिय झाले आहेत. नंदकुमार देशपांडे हे लेखक आणि हौशी छायाचित्रकार आहेत. विज्ञान शाखेत पदवी आणि व्यवस्थापन शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी न्यू इंडिया अश्यूरन्स या विमा कंपनीत नासिक, पुणे, मुंबई येथे विविध पदांवर नोकरी केली. त्यांनी विविध नाटकात भूमिका आणि दोन लघुपटांची निर्मिती केली आहे. के. नमिता प्रशांत जगण्यावर भरभरून प्रेम करणारी जिंदादिल व्यक्ती आहे. त्या म्यूरल आर्टिस्ट असून त्यांना पर्यटनाची आवड आहे. पारंपारिक कला तसेच प्राचीन आदिवासी कला जोपासायला आवडतात. अभिरुची ज्ञाते या प्रवासवर्णन साहित्यिक, भाषाप्रेमी आहेत. पुण्यातल्या अक्षरनंदन शाळेत मराठी भाषेच्या शिक्षिका आहेत.

मैत्रीचा उत्सव साजरा करणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ‘मैत्री कट्टा’ समितीने केले आहे.

# बालआनंद मेळाव्यात ८० हजारांची ऊलाढाल

**बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत विद्यार्थी व पालकांनी लुटला खरेदीचा आनंद**


अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत झालेल्या बाल आनंद मेळाव्याचे आकाशात फुगे सोडून उद्घाटन करताना संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया.

नगर – चटकदार भेळ, पाणीपुरी, नाष्ट्याचे विविध प्रकार, भाजीपाला, शालोपयोगी स्टेशनरी साहित्य व जोडीला मनोरंजक खेळांची मेजवानी अशा उत्साहपुर्ण वातावरणात अहमदनगर एज्यूकेशन सोसायटीच्या बाई इचरचबाई फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थी व पालकांच्या खरेदी विक्री व्यवहारातून सुमारे ८० हजार रुपयांची ऊलाढाल झाली. या बाल आनंद मेळाव्याचा विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांनीही आनंद लुटला.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, विश्वस्त कल्याणी फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली या बालआनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. बालआनंद मेळाव्यासाठी येणा–या विद्यार्थी व पालकांची सकाळपासूनच लगबग सुरु होती. सहभागी विद्यार्थ्यांनी शिस्तबध्दपणे विक्रीसाठी घरून करून आणलेले खाद्यपदार्थ, विविध वस्तू स्टॉलवर मांडल्या होत्या. संस्थेचे प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या विश्वस्त सुनंदाताई भालेराव, ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, मीनाताई बोरा यांच्यासह प्राथमिक व पूर्व प्राथमिक वर्गाचे शिक्षक पालक व विद्यार्थी उपस्थित होते. स्टॉल धारक विद्यार्थी खरेदीसाठी आलेल्यांना व्यवहारकौशल्य पणाला लावून आपला माल विक्री करताना दिसून येत होते. यातून मुलांवर नकळतपणे व्यवहारज्ञानाचे संस्कार होत होते. मेळाव्यानिमित्त भरविण्यात आलेल्या बाजारात विद्यार्थ्यांनी आणलेली पाणीपुरी, भेळ, इडली, वडापाव, खेळणी, भाजीपाला, शैक्षणिक साहित्य स्टॉलमध्ये ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थांच्या खरेदीनंतर मनोरंजक खेळांमधून आनंद लुटला. मेळाव्यासाठी आलेल्या प्रत्येकाने खरेदी केल्याने याठिकाणी चांगलीच आर्थिक ऊलाढाल झाली. विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉलमधून सुमारे ८० हजार रुपयांची आर्थिक ऊलाढाल झाली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, पूर्व प्राथमिक इन्चार्ज वनिता चौधरी, वर्षा चिखले यांच्यासह सविता शेळके, विशाल तांदळे, शकुंतला देसरडा, पराग विलायते, वैशाली निकम, पूजा कराळे, शरद कातोरे, वैभव वाघ, कांचन नेहुल, प्रसाद शिंदे, कांतीलाल खुरांगे यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले.

बाल आनंद मेळाव्यासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाची माहिती. पैशांचे व्यवहार समजतात. त्याचप्रमाणे कुठल्या कामासाठी किती कष्ट घ्यावे लागतात याचा अनुभव येतो, असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.

# न्यू आर्टस् कॉलेजमधील बी.बी.ए. च्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण


उन्नती फौंडेशन बंगलोर यांच्या वतीने न्यू आर्टस् मधील बी. बी. ए च्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बी.बी.ए व बी.बी.ए (आय.बी) विभागप्रमुख डॉ.मंगेश वाघमारे.

नगर – नवीन शैक्षणिक प्रणाली २०२० च्या धोरणानुसार विद्यार्थ्यांना कौशल्य व विकास वृद्धिंगत व्हावा यासाठी महाविद्यालय विशेष प्रयत्न करत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन व उन्नती फौंडेशन बंगलोर यांच्यामध्ये सामंजस्य करार झालेला आहे. फौंडेशनच्या सहकार्याने न्यू आर्टस् मधील विद्यार्थ्यांना १६५ तासाचे प्रशिक्षण देण्यास सुरवात केली आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. मंगेश वाघमारे विभागप्रमुख बी बी ए व बी बी ए (आय.बी), फौंडेशनच्या कार्यप्रमुख जयश्री त्रिभुवन, प्रा.आशिष वाणी यांच्या उपस्थितीत झाले.

आजचा विद्यार्थी जागतिक स्पर्धेत कौशल्याभिमुख व ज्ञानवर्धित असेल तरच यशस्वी होऊ शकतो त्यासाठी त्याने जीवनकौशल्य, मुलाखत तंत्र, व्यक्तिमत्व विकास, तांत्रिक गोष्टींचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रा. डॉ. मंगेश वाघमारे यांनी प्रास्ताविकात नमूद केले.

कार्यप्रमुख जयश्री त्रिभुवन यांनी या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात रोजगार तसेच नोकरी मिळवण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी होईल व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व स्वावलंबी होण्यास मदत होईल. या संपूर्ण प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना मूल्य व जीवनकौशल्य, इंग्रजी संभाषण, व्यक्तिमत्व विकास कसा करावा, मुलाखतीला कसे सामोरे जावे यावर भर देण्यात येणार असून विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल, असे कार्यप्रमुख जयश्री त्रिभुवन यांनी स्पष्ट केले.

प्रा.कैवल्य देशमुख यांचे विद्यार्थ्यांना बुद्धिमत्ता चाचणी, मूल्यांकन चाचणी, सामाजिक क्षमता, बौद्धिक क्षमता, शाररिक व मानसिक क्षमता, अभ्यासपूरक क्षमता या विषयावर मार्गदर्शन मिळणार आहे.

सूत्रसंचालन प्रा. अभिजित सातभाई यांनी केले. आभार प्रा. अनिता पेटकर यांनी मानले. कार्यक्रमात विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.


अरीहंत कॉलेज ऑफ फार्मसीत आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या मान्यतेने ‘देश का प्रकृती परीक्षण’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# अरीहंत कॉलेज ऑफ फार्मसीत ‘देश का प्रकृती परीक्षण’ कार्यक्रम

नगर – अरीहंत कॉलेज ऑफ फार्मसीत आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या मान्यतेने ‘देश का प्रकृती परीक्षण’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. धैर्यशील जीरेकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा उद्देश आयुर्वेदाच्या माध्यमातून लोकांच्या प्रकृतीनुसार आरोग्य सुधारण्याच्या संकल्पना प्रचार व प्रसार करणे हा होता. डॉ. जीरेकर यांनी आयुर्वेदातील प्रकृती विज्ञान, त्याचा आरोग्य सुधारण्यात होणारा उपयोग आणि आयुर्वेदाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदवला. ‘संकल्प: स्वास्थ्याचा आधार आयुर्वेदाचा!’ या घोषवाक्याने कार्यक्रमाला वेगळी उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी डॉ. योगेश बाफना, प्रा.माधुरी पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड, प्रा. शितल खंडागळे व प्रा. रुचिता पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# सागर ससाणे, ॲड. शारदा लगड, ॲड. सुमेध डोंगरे, गणेश बनकर, वसंत रांधवन यांना राज्यस्तरीय सावित्री-ज्योती गौरव पुरस्कार जाहीर



नगर – दरवर्षी शहरात होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. आलेल्या प्रस्तावातून या वर्षीचे पुरस्कार सागर ससाणे, ॲड. शारदा लगड, ॲड. सुमेध डोंगरे, गणेश बनकर, वसंत रांधवन यांना निवड समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

रविवारी (दि.१२ जानेवारी) गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी पद्मश्री पोपटराव पवार, खासदार निलेश लंके, समाजकार्य महाविद्यालयाचे डॉ. सुरेश पठारे, पुणे येथील विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, सुहासराव सोनवणे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, स्वागत अध्यक्ष किशोर डागवाले उपस्थित राहणार आहेत. पुरस्कार्थींचा सेमी पैठणी साडी, स्मृती चिन्ह व सन्मानपत्राने सन्मान होणार आहे.

सागर ससाणे हे शहरातील एल ॲण्ड टी इलेक्ट्रिकल ॲण्ड ॲटोमेशन व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. ते उच्चविद्या विभूषित असून, त्यांनी पीएचडी, एमबीए अशा पदव्या मिळवलेल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत व परिषदांमध्ये अनेक सुवर्णपदक प्राप्त केलेले आहे. औद्योगिक क्षेत्राचा १९ वर्षाचा अनुभव असून, अभियांत्रिकी महोत्सवात त्यांनी व्याख्यान दिलेले आहे. त्यांना इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियर्स (इंडिया) चा प्रॉमिसिंग इंजिनियर अवॉर्ड देखील मिळालेला आहे.

ॲड. शारदाताई लगड या ३२ वर्षापासून वकिलीक्षेत्रात कार्यरत आहेत. त्या सध्या अंबिका महिला सहकारी बँकेच्या चेअरमन असून, गेल्या ३० वर्षापासून महिलांच्या विविध प्रश्नांवर कार्यरत आहे. त्यांना योग विद्या धामचा योग साधनेबद्दल महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार देखील मिळालेला आहे. तसेच स्फुर्ती महिला आदर केंद्राच्या त्या संस्थापक अध्यक्ष असून, राजकीय क्षेत्रातही त्यांनी महत्त्वाची पदे भूषविलेली आहेत. सर्वसामान्यांना व महिलांना त्या कायद्याचे मार्गदर्शन करत असतात.

ॲड. सुमेध डोंगरे हे शिरूर (जि. पुणे) येथील विधीज्ञ असून, त्यांनी पीएचडी प्राप्त केलेली आहे. मुंबई उच्च न्यायालयात वकील व्यवसाय करतात. समाज भूषण सुलोचनाबाई डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून, बहुजन चळवळीत विविध उपक्रमांचे आयोजन ते करत आहे.

गणेश बनकर हे नगर तालुक्यातील कामरगावचे भूमिपुत्र असून भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. ते संत सावता क्रांती परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष व क्रांतीज्योती बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहे. सर्व जातीय वधू–वर मेळावे, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, ग्राम विकासाच्या योजना, शासकीय योजनांचा प्रचार–प्रसार सर्वसामान्यांपर्यंत करुन त्याचा लाभ मिळवून देत आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात गेल्या १५ वर्षापासून ते सातत्याने योगदान देत आहेत.

वसंतराव रांधवन पारनेर तालुक्यातील पत्रकार असून, ग्रामीण भागातील प्रश्न मांडत आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद तालुका उपाध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहे. समाज सुधारकांची जयंती साजरी करणे, विविध सामाजिक कार्यक्रमात सहभाग घेऊन मागील १६ वर्षापासून सातत्याने सामाजिक कार्य करत आहे.

सावित्री ज्योती महोत्सवाच्या पुरस्कार निवड समितीने पुरस्कारासाठी आलेल्या प्रस्तावामधून सदरील पुरस्कार्थींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरी गौरव पुरस्कार जाहीर केला आहे. पुरस्कार निवड समितीमध्ये प्रा. सुनिल मतकर, भीमराव उल्हारे, शिवाजी नवले, आरती शिंदे, रावसाहेब काळे, विनोद साळवे, निलेश रासकर, रावसाहेब मगर यांनी काम पाहिले.

# धम्माल मनोरंजन

## मनोरंजक शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) हकीकत, रिपोर्ट
४) पुस्तक, पेपर इ. चे लोकार्पण
६) गवताचा xxx ८) थांबणे
९) एक किळसवाणा प्राणी
१०) सर्व गुण असलेला
१२) रोम मधील
१३) तांदळाची एक जात
१५) ज्याचा नाश होत नाही असा १७) अनुज, लहान
१९) देव, ईश्वर
२१) विजोड २५) विळा
२६) एक अंमली पदार्थ
२८) xxx तसा वेश
२९) मौज, सुख
३०) जय जय xxxx समर्थ
३२) आवड
३४) कोकणातील एक गाव
३५) मिष्ठ
३७) जास्तीची कमाई
३८) दुर्गून, खोड
४०) मळ ४१) चाव
४२) सूर्य ४५) क्रमाणे सातवर
४७) नावड विरुद्ध
४८) संतती नसलेली
४९) प्राण चा पहिला पंजाबी चित्रपट ५१) रागीट
५३) बैलाला बांधावयाची दोरी
५४) हाताचा तळवा
५५) दिनांक

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | | | ५ | ■ | ■ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | ९ | | ■ | ■ | १० | ११ | | | |
| १२ | | | ■ | १३ | | | १४ | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | १५ | १६ | | ■ | ■ | १७ | १८ | | ■ | १९ | २० |
| ■ | ■ | २१ | | | २२ | २३ | ■ | | ■ | २४ | ■ | |
| २५ | | | ■ | ■ | २६ | | २७ | ■ | २८ | | ■ | |
| | ■ | | ■ | २९ | | ■ | ३० | ३१ | | ■ | | |
| ३२ | ३३ | ■ | ३४ | | | | ■ | | ■ | ३५ | ३६ | |
| ■ | ३७ | | | | | ■ | ■ | ३८ | ३९ | ■ | | ■ |
| ४० | | ■ | ४१ | | ■ | ४२ | ४३ | | | | ■ | ४४ |
| ४५ | | ४६ | ■ | ■ | ४७ | | | ■ | | | ४८ | |
| | ■ | ४९ | ५० | | | | ■ | ५१ | | ५२ | ■ | |
| ■ | ५३ | | | ■ | ५४ | | | | ■ | ५५ | | |

**उभे संकेत**

१) विरोध न करता
२) आराम xxx है
३) विष्णुचे बुटके रुप
४) मोठा हाहाकार
५) तपकीर, धमणी
६) पळकाढ्या
७) राजाची पत्नी
९) पाठांतर, चिंतन
११) डबा१४) मुर्ख, बेअक्कल
१६) नाशीवंत १८) वानर, मर्कट २०) जमेपर्यंत
२२) बहिणीच्या मुलीचा नवरा
२३) होडी२४) शरम नसलेला
२५) मोठे भांडे, कोपरा
२७) बरोबरी २८) देवता
२९) अधिकमास
३१) घुसखोरी करणारा
३३) मुभा, सुट
३४) एक प्राणी
३६) पाण्याने स्वच्छ करणे
३९) एक प्रकारची घोडागाडी
४०) अनेक पदार्थांचे सुवासिक मिश्रण ४२) क्षणिक झंझावात
४३) सडलेली वस्तू
४४)गणपती ४६) कावळा
४७) ठोसा, मारणे
५०) करा नाही तर xx
५१) एक पसरट भांडे
५२) जनकपुत्री



## सु विचार

दैव हे समुद्राप्रमाणे खोल आणि विस्तीर्ण आहे, पण आपल्या कर्तबगारीची भांडीच लहान आहेत.

तात्पर्य: दैवानचे एखादी गोष्ट मिळते, असे दैवावर विसंबून राहणे योग्य नाही. आपल्या कर्तबगारीने, जिद्दीने, जबर इच्छेने, आपल्याला अनेक गोष्टी मिळवता येतात, पण त्यासाठी कल्पकतेने दीर्घ प्रयत्नाला लागले पाहिजे. मग मात्र अनेक गोष्टी आपल्याला मिळतात. म्हणून सतत कार्यरत राहा.

## दिनविशेष १० जानेवारी२०२५

१७७५ : 'बाजीराव पेशवे (दुसरे)' – यांचा जन्म. (मृत्यू : २८ जानेवारी १८५१ – ब्रम्हावर्त)
१८९६ : 'दिनकर गंगाधर केळकर' – वास्तुसंग्राहक यांचा जन्म. (मृत्यू : १२ जानेवारी १९६६)
१९०० : 'मारोतराव सांबशिव कन्नमवार' – महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री यांचा जन्म. (मृत्यू : २४ नोव्हेंबर १९६३)
१९०१ : 'डॉ. गणेश हरी खरे' – इतिहास संशोधक यांचा जन्म.
१९१६ : 'सुने बर्गस्ट्रोम' – नोबेल पुरस्कार विजेते स्वीडिश बायोकेमिस्ट यांचा जन्म. (मृत्यू : १५ ऑगस्ट २००४)
१९१९ : 'श्री. र. भिडे' – संस्कुत अभ्यासक आणि रामायणातील शाप आणि वर, महाभारतातील कुमारसंभव या ग्रंथांचे लेखक यांचा जन्म.
१९३० : 'बासु चटर्जी' – भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक यांचा जन्म. (मृत्यू : ४ जून २०२०)
१९३४ : 'लिओनिड क्रावचुक' – युक्रेनचे पहिले राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू : १० मे २०२२)
१९३७ : 'मुरली देवरा' भारतीय राजकारणी यांचा जन्म. (मृत्यू : २४ नोव्हेंबर २०१४)
१९४० : 'के. जे. येसूदास' – पार्श्वगायक व संगीतकार यांचा जन्म.
१९४५ : 'जॉन मेसन' – भारतीय शिक्षणतज्ञ यांचा जन्म (मृत्यू : १७ फेब्रुवारी २०२३)
१९५० : 'नाजुबाई गावित' – आदिवासींसाठी आयुष्य वेचणारया यांचा जन्म.
१९७४ : 'ह्रितिक रोषन' – हिंदी चित्रपट अभिनेते यांचा जन्म.
वरीलप्रमाणे १० जानेवारी दिनविशेष १० क्षरर्पीरी वळर्पीळीहशीह
१० जानेवारी दिनविशेष – मृत्यू :
१७६० : 'रणवीर दत्ताजी शिंदे' – पानिपतच्या पहिल्या संग्रामातील यांचे निधन.
१७७८ : 'कार्ल लिनिअस' – स्वीडीश वनस्पतीतज्ञ यांचे निधन. (जन्म : २३ मे १७०७)
१९९९ : 'आचार्य श्रीपाद कृष्ण केळकर' – स्वातंत्र्य सैनिक व समाजवादी विचारवंत यांचे निधन.
२००२ : 'पं. चिंतामणी रघुनाथ व्यास' – ख्यालगायक, गुरु व बंदिशकार यांचे निधन. (जन्म : ९ नोव्हेंबर १९२४)
२०१७ : 'रोमन हर्झोग' – जर्मनी देशाचे ७वे राष्ट्राध्यक्ष, वकील आणि राजकारणी (जन्म : ५ एप्रिल १९३४)
१९९७ : 'अलेक्झांडर आर. टॉड' – नोबेल पारितोषिक विजेते स्कॉटिश बायोकेमिस्ट (जन्म : २ ऑक्टोबर १९०७)
१९९४ : 'गिरिजाकुमार माथूर' – हिंदी कवी (जन्म : २२ ऑगस्ट १९१९)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | क्री | पु | रा | ण | ■ | पु | रा | ण | म | त | वा | दी |
| व | ड | ला | ई | ■ | फा | र | ■ | ■ | र | ग | ■ | ना |
| दा | न | व | ■ | त | र | ण | त | ला | व | ■ | ना | ना |
| वे | ■ | ■ | ह | ल | क | ■ | ■ | व | डा | र | ■ | थ |
| र | सी | द | ■ | म | त | मो | ज | णी | ■ | वि | स | ■ |
| त्न | ■ | र | मा | ■ | ■ | र | वा | ■ | द | वा | खा | ना |
| दा | रु | बा | ज | ■ | वा | चू | न | ■ | ■ | स | रा | व |
| ख | जू | र | ■ | अं | ग | द | ■ | ब | क | र | म | ■ |
| वि | ■ | ■ | ■ | बा | बा | ■ | ■ | ■ | सा | ■ | ■ | ■ |
| णे | ■ | भा | ■ | दे | र | ■ | अं | गा | ई | गी | त | ■ |
| ■ | का | ना | ■ | वी | स | ■ | त | ■ | खा | त | ■ | हे |
| अ | ना | म | त | ■ | ■ | भा | र्या | ■ | ना | का | ■ | रं |
| ळू | ■ | ती | ळ | ■ | क | ल | म | ■ | ■ | र | ज | ब |

### फळ व आरोग्य

**कारले**

**रक्तातील साखर कमी होते**

मधुमेहावर कारल्याचा नेमका काय उपयोग आहे? यावर सध्या बरेच संशोधन चालू आहे. कारल्याच्या रसाच्या सेवनाने रक्तातली साखर कमी होते.
कोवळ्या कारल्याचे तुकडे करा. ते सावलीत सुकवा. खडखडीत सुकले की त्याचे कुटुन चूर्ण करा. हे चूर्ण म्हणजेच मधुमेहींसाठी दिव्योषधी! सकाळ– संध्याकाळ एक एक चमचा असे चार महिने चूर्ण खाल्ल्याने लघवीवाटे जाणारी साखर बंद होते. प्लीहा, यकृत आदि इंद्रिये सुद्दढ होतात.

### म्हणी व अर्थ

**गळ्यातले तुटले, ओटीत पडले.**

**अर्थः** कोणत्याही स्थितीत वस्तू जवळ असणे.

## मनोरंजक शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | |
| १० | | ११ | ■ | १२ | | १३ | | | ■ |
| ■ | ■ | १४ | १५ | | | १६ | | | ■ |
| १७ | १८ | | | ■ | ■ | १९ | | | |
| २० | | ■ | ■ | २१ | | | | | २२ |
| २३ | | २४ | २५ | | ■ | ■ | २६ | | |
| | ■ | २७ | | | २८ | | २९ | | ■ |
| | ■ | | ■ | ३० | | ■ | ३१ | | |

**आडवे संकेत**

१) संतुष्ट ३) वाडा
५) वर्तुळाकार
७) ध्वनी, आवाज
८) शुद्ध, पवित्र
९) दिन
१०) नदीचे उंच तीर
१२) अलग अलग बाब घेऊन
१४) सजीवांना शेवटी हे येते
१६) दु:खाची तीव्र वेदना
१७) पांघरण्याचे साधन१९) अति खोल
२०) केसांची गुंतागुंत
२१) आदरच्या विरुद्ध
२३) वेगवेगळी गोष्ट घेऊन २६) षडयंत्र
२७) लाक्षणिक अर्थाने कैदी
३०) शंभर क्विंटल
३१) हुद्दा

**उभे संकेत**

१) आरती वगैरे झाल्यानंतर वाटतात तो गोड पदार्थ
२) बाबा, कलम, वर्ग
३) आच्छादण
४) ताटली, निर्वाहार्थ दिलेली इनाम जमीन इ.
५) लहान लेकरांना होणारा एक त्वचा विकार
६) जखमेतील द्रव्य
९) वारेमाप खर्च करणारा, उधळ्या
११) एक चर्मवाद्य
१३) एक हिंदी चित्रपट
१५) युद्ध
१७) लुळ्यापांगळ्या ढोरांना पोसण्याचे ठिकाण १८) अवयव, परमाणु
२१) वस्ताद, तरबेज
२२) गर्द, घन २४) चिलट, डास २५) दिवस २६) प्राचीन शास्त्रज्ञ ऋषी २८) एक साबू २९) माकडाचा आवाज

### मागील उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | फि | म | बा | ज | ■ | क | प | ■ | व |
| भि | क | ■ | र | ह | सा | ळी | ■ | क | र्ज |
| वा | ट | प | द्रा | र | ■ | चा | क | र | ■ |
| द | ■ | ना | ना | ■ | सा | ना | ■ | व | ट |
| न | ग | मा | ■ | स | म | र | गी | त | ■ |
| ■ | व | ■ | ल | ■ | ■ | द | ■ | का | क |
| आ | ग | र | क | र | ■ | ■ | क | ठी | ण |
| न | वा | ग | त | ■ | स | र | स | ■ | ख |
| न | ■ | ■ | र | ■ | सा | व | र | क | र |

## रुचिदा

### तिळगुळाच्या कोचऱ्या



**साहित्यः** १ वाटी कणिक, २ वाट्या पाणी, २ चमचे तेल, अर्धी वाटी गूळ, वेलची पूड, चिमूटभर मीठ, तीळ भाजून त्याचा कूट, तळण्यास तूप.

**कृतीः** प्रथम उकळलेल्या पाण्यात तेल टाकून त्यात कणिक व एकसारखे हलवून उकड तयार करा. गोळा थंड झाल्यावर त्याचे गोळे करा. सारणाकरिता तिळाचा कूट, गूळ व वेलची पूड तयार करा व उकडीच्या कणकेच्या गोळ्याच्या पात्या करुन त्यात वरील सारण भरुन करंज्या करा व तुपात तळा. नेहमीपेक्षा ह्या करंज्या वेगळ्या लागतात.

## टिप्स

■ थंडीच्या काळात हवेने केक भिजू नये, यासाठी जेवढ्या मापात तूप/ बटर दिले असेल, त्याच्या निम्मे रिफाईंड तेल, निम्मे वनस्पती/ लोणी वापरा.
■ बेकिंग पावडर व सोडा ताजा असावा म्हणजे पदार्थ फुलून येईल त्याचप्रमाणे यीस्टही ताजे घ्यावे.
■ नेहमी पाककृतीप्रमाणेच प्रत्येक पदार्थाचे माप घ्यावे म्हणजे पदार्थ बिघडणार नाही.
■ मैदा ताजा व कीड अथवा जाळी लागलेला नसावा तो तीन वेळा चाळून घ्यावा. त्यामुळे त्याचे कणन् कण सुट होतात व मैद्यात हवा मिसळून केक हलका होण्यात खूपच मदत होते.
■ केक पात्र खूप लहान वा मोठे नसावे, ते आपल्या तयार मिश्रणाच्या प्रमात हवे. ते बेक झाले, की फुगून निदान दीड ते दोनपट वाढते हे विसरु नये. केकपात्रात केकचे मिश्रण बेक करण्यासाठी घालण्याआधी त्याला आतून तुपाचा हात लावून घ्यावा. त्यावर मैदा सर्व बाजूंनी, तळावर भुरभुरवून घ्यावा. तसेच, मैदा सगळीकडे पसरतो, पदार्थ बेक झाल्यावर तो तळाला चिकटूनही बसत नाही व अख्खा पदार्थ न मोडता केक पात्रातून काढता येतो.


### मागील फिल्मी कोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कु | रु | क्षे | त्र | ■ | आ | र | पा | र | ■ | य | ती | म |
| ली | ■ | ■ | ■ | ब | न | ■ | प | ■ | हा | स | न | ■ |
| नं | दि | ता | दा | स | ■ | पु | का | र | ■ | बॉ | ■ | ■ |
| ब | ■ | क | ■ | ■ | स | ■ | अं | ■ | आ | स | पा | स |
| र | ■ | त | क | दि | र | का | त | मा | शा | ■ | प | ■ |
| व | ■ | व | ■ | ■ | ग | ■ | ■ | ■ | भो | ■ | की | म |
| न | ज | र | के | सा | म | ने | ■ | ■ | स | ड | क | ■ |
| ■ | न | ■ | त | ■ | ■ | हा | ■ | शो | ले | ■ | मा | ■ |
| तु | म | बी | न | ■ | रा | ■ | स | र | ■ | आ | ई | ना |
| ■ | ज | ■ | मे | रा | ज | वा | ब | ■ | बा | ज | ■ | मु |
| ■ | न | सि | ह | त | ■ | र | ■ | प | ■ | का | ■ | म |
| ह | म | ■ | ता | ■ | दा | दा | गि | री | ■ | दौ | ■ | की |
| त्या | ■ | ■ | ■ | त | ल | त | ■ | ■ | अ | र | मा | न |

## फिल्मी शब्दकोडे

**आडवे संकेत**

१) तुमसे मिलना बाते करना बडा अच्छा लगता है... यह गीत सलमान खान अभिनीत इस फिल्म का है.
३) सन् १९९५ में शोमु मुखर्जी ने बनाई इस फिल्म में सलमान खान और मनिषा कोईराला थे.
८) ल द का अक्षरबदल
९) मिथून चक्रवर्ती और सलमा आगा अभिनीत एक फिल्म.
११) सन् १९८९ में हरमेश मल्होत्रा निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर और श्रीदेवी थे.
१३) हमने तुमको दिल ये दे दिया ये भि ना पुछा कौन हो तुम.... यह गीत इस फिल्म का है.
१४) इस फिल्म में सचिन और साधना सिंह थे. १६) मिर्झा (अभिनेत्री)
१७) सन् १९८३ में राज एन. सिप्पी निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, शत्रूघ्न सिन्हा, पुनम ढिल्लो और जयाप्रदा थे.
१९) सन् २००२ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल, अक्षय खन्ना और अमिषा पटेल थे.
२१) सन् १९९६ में बनी इस फिल्म में गोविंद मेनन और तब्बु थे.
२३) सन् १९९५ में कुक्कु कोहली निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और तब्बु थे.
२५) सन् २००२ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में सलमान खान और अमिषा पटेल थे. २६) पवार (अभिनेत्री)
२८) मै करने चला (फिल्म)
२९) सन् १९९७ में प्रियदर्शन निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और तब्बु थे.
३०) गेट (फिल्म)
३२) कर्मा इस फिल्म की एक अभिनेत्री.
३३) इस फिल्म में अविनाश वाधवन और दिव्या भारती थे.



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | ४ | ५ | | | ६ | | ■ |
| | ■ | | ■ | ७ | ■ | ८ | | ■ | ■ | | ■ | ■ |
| ९ | | | | | | | | | | | ■ | १० |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ | ११ | | |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | १२ | ■ | ■ | |
| ■ | १३ | | | ■ | १४ | | | | | | ■ | |
| १५ | ■ | | ■ | १६ | | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ |
| १७ | १८ | | | ■ | | ■ | | ■ | १९ | | २० | |
| ■ | | ■ | ■ | २१ | | २२ | | ■ | | ■ | | ■ |
| २३ | | | २४ | ■ | ■ | | ■ | २५ | | | | |
| ■ | | ■ | २६ | | २७ | ■ | २८ | | ■ | ■ | | ■ |
| २९ | | | | ■ | | ■ | ■ | | ■ | ३० | | ३१ |
| ■ | | ■ | ■ | ३२ | | | ■ | ३३ | | ■ | ■ | |

**उभे संकेत**

१) सन् १९८२ में ए.सी. त्रिलोकचंदर निर्देशित इस फिल्म में कुमार गौरव और पुनम ढिल्लो थे.
२) दिल लेके हां जा लेके हां तेरी गली में मै आ गया.... यह गीत इस फिल्म का है.
४) सन् २००१ में अनिल शर्मा निर्देशित इस फिल्म में सनी देओल और अमिषा पटेल थे.
६) इस फिल्म में संजीव कुमार और शबाना आझमी थे.
७) सन् १९९७ में राज कंवर निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर, उर्मिला मातोंडकर और श्रीदेवी थे.
१०) सन् १९९८ में रवी दिवान निर्देशित इस फिल्म में सुनील शेट्टी और रविना टंडन थे.
१२) घर से निकलते ही कुछ दुर चलते ही रस्ते में है उसका घर.... यह गीत इस फिल्म का है.
१४) सन् १९८७ में महेश भट्ट निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर और भावना भट्ट थे.
१५) इस फिल्म में विनोद खन्ना और शबाना आझमी थे.
१८) चुरालीया है तुमने जो दिल को नजर नही चुराना सनम... यह गीत इस फिल्म का है.
२०) सपने साजन के इस फिल्म का एक अभिनेता.
२२) सन् १९७५ में ऋषीकेश मुखर्जी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और जया भादुडी थे.
२४) अजीज (निर्देशक)
२५) सन् १९९४ में नरेश मल्होत्रा निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और काजोल थे.
२७) इस फिल्म में धर्मेंद्र, शत्रूघ्न सिन्हा, फरहा और काजोल थे.
३१) सन् १९८६ में महेश भट्ट निर्देशित कुमार गौरव, संजय दत्त और अमृता सिंह थे.

# समाजातील भ्रष्टाचार, अनागोंदी एकात्मिक ज्ञान सिध्दांताने संपणार

## जनतेमध्ये एकात्मिक ज्ञान सिध्दांताच्या जागृतीसाठी पुढाकार

नगर – समाजातील भ्रष्टाचार, अनागोंदी एकात्मिक ज्ञान सिध्दांताने संपवू शकणार असल्याचा दावा करुन, पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने जनतेमध्ये एकात्मिक ज्ञान सिध्दांताची जागृती करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली आहे.



भारतासह जगभरात भ्रष्टाचाराच्या आणि अनागोंदीच्या विरोधात लढणाऱ्या लोकांना तात्पुरता पराभव स्वीकारावा लागला. त्याचा भ्रष्टाचाऱ्यांनी आपण कलियुगात वावरतो भ्रष्टाचार करणे आणि अनागोंदी वाढविणे याला कोणीही सजा करू शकत नाही, असा विचार सर्वत्र पसरविला आहे. त्यातून ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आणि सर्व सजीव सृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले. महाराष्ट्रात सहकाराने गेली ५० वर्षे सर्वांना फायदे दिले. परंतु साखर कारखाने, पतसंस्थांचा पैसा खाजगी वापरासाठी भ्रष्टाचारातून घरी नेण्यात आला. त्यामुळे जनतेच्या संस्था मोडीत निघाल्या. शेतकरी आणि जनतेला कोट्यावधी रुपयांना बुडविले. पाप आणि पुण्य या संकल्पना कोणीही मानायला तयार नाहीत. त्यामुळे महसूल न्याय विक्री सर्रास सुरू आहे. सरकारी भ्रष्टाचार टोकाला गेला, मतं खरेदीकरुन सत्तापेंढाऱ्यांनी सातत्याने सत्ता मिळवली असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

परंतु या गोष्टी यापुढे चालणार नाहीत. कारण एकात्मिक ज्ञान सिद्धांत आणि परिवर्तन चक्र सिद्धांत यातून ही बाब सिद्ध झाली की, ऊर्जा, माहिती आणि चेतना यांच्या परस्पर संबंधातून प्रत्येक गोष्टीचे परिणाम निर्माण होतात. त्याचा परिणाम चांगले कार्य करणाऱ्याला समाधान करणारे यश मिळते. तर लबाड, ढोंगी आणि भ्रष्टाचारी यांच्या पुढील आयुष्यात यातना, दुःखाशिवाय काही एक शिल्लक राहत नाही. एकंदरीत कालपर्यंत कर्म सिद्धांत नैतिकतेवर आधारित होता. परंतु त्यामागे माहिती, चेतना आणि ऊर्जा यांच्या प्रक्रियेतून होणारे परिणाम कारणीभूत आहेत, ही बाबा आता विज्ञानाने सिद्ध होऊ शकणार आहे. त्यामुळे कोर्ट कचेरीतच न्याय मिळेल असे नाही, तर समाजाला जाणीवपूर्वक दुबळे, करणाऱ्या ढोंगी आणि भ्रष्टाचारांच्या डोक्यात विज्ञान आणि निसर्ग प्रकाश टाकल्याशिवाय राहणार नाही, ही बाब सर्वांना स्पष्ट रीतीने कळू शकणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

कालपर्यंत परमेश्वर म्हणून समजली जाणारी संज्ञा आता विश्वातील अभौतिक सर्वव्यापी चेतना आहे. आणि या चेतनाच्या कार्यपद्धतीतून निसर्गातील माणसासह कोणतीही बाब सुटू शकणार नाही. हे आता एकात्मिक ज्ञान सिद्धांताने विज्ञान, क्वांटम फिजिक्स, अध्यात्म, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, गणित या सर्वांचा एकच अभ्यास करून निसर्गातील कालपर्यंत गुप्त असलेली गोष्ट उघड्यावर आणली आहे. त्यामुळे समाजाचे, निसर्गाचे जाणीवपूर्वक शोषण करणाऱ्यांना दुःखाच्या खाईत निसर्ग आणि एकात्मिक सिद्धांतामागील विज्ञान नेल्याशिवाय राहणार नाही. सत्ता, संपत्ती आणि खोटी प्रतिष्ठा कोणालाही वाचवू शकणार नाही. सत्यमेव जयते, हीच भारताची घोषणा एकात्मिक ज्ञान सिध्दांताने सिद्ध केली असल्याचे म्हंटले आहे.

# पीपल्स रिपब्लिकन पक्षाची जिल्हा कार्यकारणी बरखास्त

नगर – पीपल्स रिपब्लिकन पक्षाची जिल्हा, तालुका, शहर कार्यकारणी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे व लघु उद्योग महामंडळाचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या आदेशानुसार बरखास्त केली असल्याची घोषणा पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड यांनी केली आहे.



सुमेध गायकवाड

लवकरच नवीन कार्यकारणी ही फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जयदीप कवाडे, युवक प्रदेशाध्यक्ष व महत्वाच्या नेते मंडळी यांच्या उपस्थितीमध्ये व नेत्यांच्या आदेशानुसार करण्यात येईल. तसेच पक्षासाठी कार्यरत व पक्षाच्या आदेशानुसार काम करणाऱ्या व्यक्ती यांना पक्षात स्थान देण्यात येईल. ज्यांना पीपल्स रिपब्लिकन पक्ष यामध्ये काम करायचे असेल त्यांनी पक्ष कार्यालय, अ. नगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन सुमेध गायकवाड यांच्यावतीने करण्यात आले आहे.



अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली (स्कूल कनेक्ट २.०) महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक सदस्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि त्यातील सहभागीत्व याबद्दलचे उपप्राचार्य विनीत गायकवाड यांनी मार्गदर्शन आले. यावेळी उपप्राचार्य दिलीप भालसिंग, डॉ. नोवेल पारगे आदी.

# नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मोठा फायदा

### उपप्राचार्य विनीत गायकवाड यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन

नगर – विद्यार्थ्याला एखाद्या पदवीचे शिक्षण घेताना कोणत्याही टप्प्यावर अभ्यासक्रम सोडावा लागला तरी त्याने घेतलेले शिक्षण वाया जाणार नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार क्रेडिट्स आणि प्रमाणपत्र मिळू शकेल. त्यानुसार विद्यार्थ्याला रोजगाराच्या संधीही खुल्या होतील. या नव्या धोरणात कोणत्याही टप्प्यावर अभ्यासक्रम सोडण्याची किंवा अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याची मुभा असल्याने नोकरी करून शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होईल, असे प्रतिपादन उपप्राचार्य विनीत गायकवाड यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालय प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली (स्कूल कनेक्ट २.०) महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक सदस्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि त्यातील सहभागीत्व याबद्दलचे उपप्राचार्य विनीत गायकवाड यांनी मार्गदर्शन आले. यावेळी उपप्राचार्य दिलीप भालसिंग, डॉ. नोवेल पारगे, उपस्थित होते.

पुढे उपप्राचार्य गायकवाड यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील नवीन अभ्यासक्रम, छएझ मार्गदर्शक तत्वे, याबाबत प्राध्यापक आणि सदस्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विलास नाबदे यांनी केले. तर डॉ.रविकिरण लाटे यांनी आभार मानले.

# शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे ही धडे देणे गरजेचे

### उद्योजक अरुण कुलकर्णी यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्या प्रशाला माध्यमिक विभागचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, शाळा ही ज्ञानाचे मंदिर आहे. लक्ष देऊन अभ्यास केल्यास सर्वांगिण विकास होऊन यश प्राप्त होते. यापुढे शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे ही धडे देणे अत्यंत आवश्यक आहे. शालेय जीवनातून पारंपारीक शिक्षणाबरोबर कलात्मक शिक्षणाची आज गरज आहे. वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. त्यातूनच विद्यार्थी घडतो. शिक्षणानेच ध्येय निश्चित होते, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उद्योजक अरुण कुलकर्णी यांनी केले.




श्री समर्थ विद्या प्रशाला माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलनात नृत्यकला सादर करतांना विद्यार्थी. (छाया – श्रीकांत वंगारी)

सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्या प्रशाला माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन अरुण कुलकर्णी हस्ते करण्यात आले. यावेळी शालेय समिती चेअरमन स्वप्नील कुलकर्णी, समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन वि. ल, सोनटक्के, उपाध्यक्ष दीपक ओहळ, श्रीपाद कुलकर्णी, सुरेश क्षीरसागर, कि. म. देशपांडे, संध्या कुलकर्णी, सु. भा. जोशी, माध्य.च्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी, सावेडी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.गुंफेकर, सांगलेगल्ली प्राथमिकचे मुख्याध्यापक अजय महाजन, श्रीमती नागरगोजे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना कुलकर्णी म्हणाले की, भारत आज जागतिकीकरणाकडे वाटचाल करत असतांना विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे धडे देवुन त्यांना सक्षम बनवणे गरजेचे आहे. पुढील उच्च शिक्षण खर्चीक असल्याने कौशल्य विकासचे सरकारी योजनांचा आपल्या शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना संस्थेने लाभ मिळवून द्यावा, त्यातूच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होईल आणि भविष्यात सक्षम पिढी तयार होईल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वप्नील कुलकर्णी म्हणाले कि, मोबाईलच्या जमान्यात आरोग्य सांभाळणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धेत आणि वार्षिक स्नेहसंमेलनात भाग घेऊन यश संपादन करावे.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी वर्षभर शाळेत राबवणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती देऊन स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शुभेच्या दिल्या. सूत्रसंचालन शारदा होशिंग यांनी केले तर आभार श्रुती कुलकर्णी यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शन कार्यक्रमास पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कविजंगनगर परिसरात मानव विकास परिषद कार्यालयाचा शुभारंभ

नगर – शहरातील नगर ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील, कविजंगनगर परीसरात, बी टी आर गेट समोर महाराजा पॅलेस, काविजंग लॉन शेजारी मानव विकास परिषदच्या कार्यालयाचे उद्घाटन ७ जानेवारी रोजी कामगार आयुक्त भिसले यांच्या हस्ते करण्यात आले.

नागरिकांनी समाजात घडणाऱ्या घटनांमुळे त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला घाबरुन न जाता मानव विकास परिषद कार्यालयाशी संपर्क करावा. मानव विकास परिषद नागरिकांच्या हक्कासाठी व न्यायासाठी सदैव त्यांच्या पाठीशी राहील. नागरिकांच्या हक्कासाठी तसेच नागरिकांवर जेथे जेथे अन्याय होईल तेथे तेथे मानव विकास परिषद नागरिकांच्या पाठीशी राहील, असा विश्वास यावेळी मानव विकास परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष अफसर शेख यांनी व्यक्त केला.

# स्पर्धांच्या माध्यमातून कामाचा ताण कमी होतो

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे प्रतिपादन; नगरपरिषदस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

नगर–स्पर्धांच्या माध्यमातून कामाचा ताण कमी होऊन नवी ऊर्जा अधिकारी – कर्मचाऱ्यांना मिळते, तसेच त्यांच्यात सांघिक भावना निर्माण होते. त्यामुळे अशा स्पर्धांचे नियमितपणे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी व्यक्त केली. स्पर्धा नियोजनाबद्दल श्री.खांडकेकर यांचे कौतुक करून स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.



नगरपरिषदस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा सहआयुक्त प्रशांत खांडकेकर आदी.

नगरविकास विभागांतर्गत जिल्हा नगरपरिषदस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण मंगळवारी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा सहआयुक्त प्रशांत खांडकेकर आदी उपस्थित होते.

श्री.येरेकर म्हणाले, खेळामुळे मानवी जीवनातील ताण – तणाव कमी होण्यास मदत होते. कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ताण असतो. त्यातून खेळासाठी वेळ काढल्यास जीवनातील आनंद घेता येतो. या क्रीडा स्पर्धांपुरता आपला खेळ मर्यादित न ठेवता यापुढे आपण सातत्याने दररोज काही वेळ स्वतःसाठी काढून आपले कौशल्य आणि छंदाची जोपासना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

३२ क्रीडा प्रकार आणि ९ सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. स्पर्धेत सहभागी सर्व नगरपरिषदांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. राहुरी नगरपरिषदेने सर्वाधिक पारितोषिके पटकावले. त्या खालोखाल श्रीरामपूर आणि देवळाली नगरपरिषदेने यश संपादन केले.

राज्याच्या क्रीडा धोरणास अनुसरून नगरविकास विभागाच्या अंतर्गत जिल्हा नगरपरिषदस्तरीय वार्षिक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन २७ ते २९ डिसेंबर २०२४ कालावधीत राहुरी कृषी विद्यापीठात करण्यात आले होते. स्पर्धेत जिल्ह्यातील १५ नगरपरिषदा व नगरपंचायती तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास शाखेत कार्यरत अधिकारी – कर्मचारी अशा एकूण ९७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. ३९ क्रीडा व सांस्कृतिक प्रकारात स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी विविध समित्यांची व उप समित्यांची स्थापना करण्यात आली होती. नियोजन समिती सदस्य सचिव म्हणून देवळाली प्रवरानगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे मुख्याधिकारी आणि अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त, सहायक आयुक्त, स्पर्धक खेळाडू आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



श्री विठ्ठल मंदिर ट्रस्टच्या मालकीची तोफखाना येथे दत्तात्रय रामचंद्र वरुडे व बाळासाहेब रामचंद्र वरुडे यांच्या कडे ५० वर्षापासून ताब्यात असलेली जागा विठ्ठल मंदीर ट्रस्टला कोणताही मोबदला न घेता सुपूर्द केली. त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

# ५० वर्षापासून ताब्यात असलेली जागा श्री विठ्ठल मंदिर ट्रस्टला कोणत्याही मोबदला न घेता सुपूर्द केल्याबद्दल वरुडे बंधूंचा सत्कार

नगर – श्री विठ्ठल मंदिर ट्रस्टच्या मालकीची तोफखाना येथे दत्तात्रय रामचंद्र वरुडे व बाळासाहेब रामचंद्र वरुडे यांच्याकडे ५० वर्षापासून ताब्यात असलेली जागा विठ्ठल मंदीर ट्रस्टला कोणताही मोबदला न घेता सुपूर्द केली. त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी राजुमामा जाधव, ॲड. धनंजय जाधव, ट्रस्टचे अध्यक्ष रमेश बोगा, सुभाष धोत्रे, राजेंद्र बोगा, अनिल बोगा, संजय बोगा, सुर्यकांत कांबळे, नरेश कांबळे, शिवदत्त पांढरे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड.धनंजय जाधव म्हणाले की, दत्तात्रय वरुडे व बाळासाहेब वरुडे यांनी समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. त्यांना राहण्यासाठी घर नसताना देखील त्यांनी जागा खाली करून दिली. तसेच ज्या ठिकाणी देवस्थानाच्या जागेवर भाडेकरूंचा ताबा आहे व ज्यांच्याकडे दुसरीकडे जागा आहे त्यांनी त्यांच्या ताब्यातील जागा देवस्थानकडे सुपुर्द करुन समाजापुढे आदर्श ठेवावा.

तसेच यावेळी श्री विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष रमेश बोगा यांनी वरुडे बंधुचे व तसेच याकामी सहकार्य केले म्हणून राजुमामा जाधव व धनंजय जाधव यांचे आभार मानले.



स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सत्कार करताना ब्रिगेडियर अजय दलाल, कर्नल डॉ. नितुल बेवाल, लेफ्ट. कर्नल ओहलाम, अमोल बास्कर.

# ‘स्नेहबंध’चे नि:स्वार्थ भावनेने सामाजिक, शैक्षणिक काम

### ब्रिगेडियर अजय दलाल यांचे प्रतिपादन

नगर – समाजातील गरजू, वंचित, निराधार, गरीब विद्यार्थी व ज्येष्ठांसाठी नि:स्वार्थ भावनेने स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे कार्य करत आहे, असे प्रतिपादन एसीसी अँड एस कमांड चे ब्रिगेडियर अजय दलाल यांनी केले.

कार्याच्या योगदानाबद्दल ब्रिगेडियर अजय दलाल यांनी उद्धव शिंदे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मिलिटरी हॉस्पिटलचे कर्नल डॉ. नितुल बेवाल, लेफ्ट. कर्नल ओहलाम, टुरिस्ट गाईड अमोल बास्कर, स्वयंम बास्कर उपस्थित होते.

ब्रिगेडियर दलाल म्हणाले, फाउंडेशनच्या माध्यमातून डॉ. उद्धव शिंदे हे अनेक सामाजिक उपक्रम राबवतात, तसेच पर्यावरण रक्षणासाठी ही वृक्ष लागवडीद्वारे कार्य करत आहेत. त्यांनी गेल्या आठ वर्षात अनेक झाडे लावली आहेत, समाजातील वंचितांबद्दल व पर्यावरण रक्षणाबद्दलची त्यांची तळमळ कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कार्यास शुभेच्छा देतो. कर्नल डॉ. नितुल बेवाल, लेफ्ट. कर्नल ओहलाम यांनीही स्नेहबंधच्या कार्याचे कौतुक केले.

# भिंगारमध्ये एकास मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – दुकानात पूर्ण औषध मिळत नाही असे पेशंटला का सांगतोस असे म्हणून दोघांनी एकास शिवीगाळ दमदाटी करीत मारहाण केली. यावेळी भांडणात मध्यस्ती करणाऱ्या महिलेसही शिवीगाळ करीत हाताच्या चापटीने व दगडाने मारहाण केल्याची घटना भिंगार येथील पाटील गल्ली येथील मातोश्री मेडिकल दुकानासमोर बुधवारी (दि.८ जानेवारी) दुपारी घडली.

अभिजित अरुण पवार (रा.अमळनेर बीड) यास पांढरे (पूर्ण नाव माहित नाही,) याने तू पेशंटला दुकानात पूर्ण औषध मिळत नाही, असे का सांगतोस असे म्हणून त्याने व त्याच्या एक साथीदाराने शिवीगाळ करून हाताच्या चापटीने मारहाण केली. त्यावेळी पवार याची पत्नी भांडण सोडविण्याकरिता मध्ये आली असता तिलाही शिवीगाळ करून दगडाने मारहाण केली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अभिजित पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार गारुडकर हे करीत आहे.

# उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी स्वत: लक्ष घालणार

### जिल्ह्याच्या उद्योगाशी निगडीत समस्या किंवा तक्रारी कळविण्याचे आवाहन

नगर – जिल्ह्यातील उद्योजकांच्या समस्या आणि तक्रारी सोडवून औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पुढाकार घेतला असून उद्योजकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक एकत्रितपणे औद्योगिक क्षेत्रांना भेटी देणार असून उद्योग संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत.

उद्योजकांना उद्योगस्नेही वातावरणात उद्योगाचा विकास करता यावा यासाठी त्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना कोणाकडूनही आणि कसल्याही प्रकारचा त्रास होत असल्यास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२४१२३४५००१ या क्रमांकावर कळवावे. जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्षात भेटूनही तक्रार देता येईल किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्त्यावर पत्राद्वारेदेखील कळविता येईल. कारवाई करतांना सबंधित उद्योजक किंवा इतर व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

जिल्ह्यात रोजगार निर्मितीसाठी औद्योगिक विकास महत्त्वाचा असून जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत मोठे उद्योग यावेत यासाठी शासन आणि प्रशासन प्रयत्नशील आहे. उद्योगांसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करून उद्योगांना जिल्ह्याकडे आकर्षित करण्यात यशही येत आहे. जिल्ह्यात नव्या औद्योगिक वसाहती उभ्या करण्याचे प्रयत्न शासनामार्फत सुरू आहेत. अशा परिस्थितीत उद्योजकांना त्यांच्या उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यात अडथळा आणणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

उद्योजकांनी तक्रारी व्यतिरिक्त इतरही समस्या असल्यास त्या जिल्हा उद्योग केंद्र किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे कळवाव्यात. उद्योगांच्या समस्या दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री.सालीमठ यांनी स्पष्ट केले आहे.

क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

